ठाणे, बुधवार दि. १३ नोव्हेंबर २०२४ | वर्ष : १३, अंक : १९६ , पाने : ६, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख

**हवामान बदलाचे संभाव्य धोके**

सध्या जगाला हवामान बदलाला सामोरे जावे लागत आहे. याचबरोबर जुने-सुप्त व्हायरस पुन्हा परतण्याचा युरोपला धोका असल्याचा इशारा संशोधकांनी दिला आहे. ...पान २ वर

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३२° से | २७° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७२,३२५ | ९९,९८० |

**डोकं खाजवा** -अशोक सुतार



निवडणूक आली की सक्रिय होता, हे वागणं बरं नव्हे !

# जुनी शिवसेना फोडण्याचे पुण्यकर्म पवार साहेबांनी केलेय

## शरद पवारांचा टीकेनंतर मंत्री छगन भुजबळांचा गौप्यस्फोट

**नाशिक : राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी अजित पवारांसोबत गेलेल्या आणि सध्याचे अन्न पुरवठा मंत्री असलेल्या छगन भुजबळ यांच्यावर आज जोरदार हल्लाबोल केलाय. महाराष्ट्राच्या विधानसभा, विधानपरिषदेत संधी दिली, विरोधी पक्षनेते पद दिले. पण, त्यांनी काही उद्योग केले, त्यांना पद सोडवं लागलं, तुरुंगात गेले, त्यांना भेटायला कोणी जात नव्हते. माझी मुलगी, आम्ही त्यांना भेटायला गेलो, त्यांना पुन्हा संधी दिली, तुम्ही त्यांना निवडून दिले असे म्हणत शरद पवारांनी छगन भुजबळांवर थेट हल्लाबोल केलाय.**

मुबंईतील शिवाजी पार्कवर संमेलन घेतले होते, त्याचे अध्यक्षपद भुजबळ यांना दिले. उपमुख्यमंत्री पद दिले, त्यानंतर ते आणखी उद्योग करत होते, त्याचा परिणाम सरकारवर झाल्याचेही शरद पवारांनी म्हटले. एखाद्या माणसानं चुकीचे काम करताना काही मर्यादा असतात, त्या भुजबळ यांनी शिल्लक ठेवल्या नाहीत, अशा लोकांना पुन्हा निवडुन द्यायचं नाही हा विचार तुम्ही करायचा आहे. असे म्हणत शरद पवारांनी येवला येथील सभेतून येवलेकरांना साद घातली आहे.

शरद पवारांनी माझ्या बाबत आता का बोलले, हे मला कळले नाही. मात्र शिवसेना फोडण्याचे पुण्यकर्म पवार साहेबांनी केलेय. पवार साहेबांनीच हे चांगले काम केलंय. ते जर केलं नसतं तर आज फुटा फूट झाली नसती. असा गंभीर आरोप करत शरद पवार यांनी केलेल्या टीकेला छगन भुजबळ यांनी पलटवारकरत उत्तर दिले आहे.



**शरद पवारांचे निकटवर्तीय आणि जवळचे मानले जाणाऱ्या मंत्री छगन भुजबळ यांनीही त्यांची साथ सोडून अजित पवारांसोबत सत्तेत सहभाग घेतला. त्यामुळे, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून येवला मतदारसंघात उमेदवार देण्यात आला आहे. येथील मतदारसंघात आज शरद पवारांची सभा होत असून त्यांनी छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.**

### ...अब बात निकली है तो दुर तक जयेगी-भुजबळ

काँगेसमधून तुम्हाला दूर केले तेव्हा एकमेव माणुस छगन भुजबळ तुमच्या बरोबर होता.मुकुल वासनिकसह सर्व सांगत होते तुम्ही जाऊ नका, मी तुम्हाला मुख्यमंत्री करतो पण मी गेलो नाही, पवार साहेब तुमच्या प्रेम पोटी मी आलो होतो. माझावर हल्ला झाला तेव्हा पवार साहेब मला भेटण्यासाठी आले होते. पवार साहेब असे कसे काय विसरतात? आता हे सर्व मुद्दे काढण्याचे काय गरज आहे, जुने मुडदे उकरू नव्या गोष्टी बाहेर आल्या तर बात दुर तक जयेगी. मात्र पवार साहेबांबद्दल मला आदर आहे. तो कायम राहणार. पण तुम्ही काही बोललात म्हणून मला खुलासा करावा लागतोय, असेही मंत्री छगन भुजबळ

### माझ्यात काही नसतं तर मला पवारसाहेबांनी मंत्री पद दिले नसतं- छगन भुजबळ

बाळासाहेब ठाकरे यांनी मला आमदार, मंत्री केलं. याबाबत मी आभार मानले आहे. शरद पवारांनी माझ्या बाबत आता का बोलले हे मला कळले नाही. माझ्यात जर काही तरी असेल तर बाळासाहेब नी मला मंत्री पद दिले. माझ्यात काही नसेल तर मला पवार साहेब यांनी महसूलमंत्री पद दिले नसते. मागेच माझ्याकडं नवनवीन लोक असल्याने मंत्री पद दिले नाही, असे बोलले. मी नव्हतो तर अजित पवार, आर आर पाटील यांना का पद नाही दिले. सुधाकर राव नाईक आणि पवार साहेबांचे टोकाचे मतभेद झाले. एवढे की दंगे सुधाकर राव नाईक याना सांभाळता येत नाही म्हणन पुन्हा त्यांना दिल्लीतून पाठवले.

मुख्यमंत्री झाले तर वरचढ ठरतील म्हणून इतरांना होऊ दिले नाही. तेलगी प्रकरण माझा काही संबंध नसताना राजीनामा द्यायला लावला. Tv चॅनल वर हल्ला झाला यांबद्दल मला काही महिती नाही, म्हणून राजीनामा द्यायला लावला. मी देण्याच्या आधी त्यांनी राजिनामा दिला. यात पुढे बोलण्यासारखे खूप होते, पण आता बोलणार नाही, असे म्हणत छगन भुजबळ यांनी अनेक खुलासे यावेळी केले आहे.

**भुजबळांनी मर्यादा शिल्लक ठेवल्या नाहीत- येवल्यातून शरद पवारांचा हल्लाबोल** (सविस्तर वृत्त पान २ वर)

**थोडक्यात घडामोडी**

### अबब! मुंबई विमानतळावर पकडलं २.२७ कोटींचं ३ किलो सोनं, ट्राऊजरमधून आणल्या सोन्याच्या विटा

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून तीन किलो सोन जप्त करण्यात आलं आहे. या जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत २.२७ कोटी रुपये इतकी असल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकरणी दुबईवरून आलेल्या प्रवाशाला अटक करण्यात आली आहे. त्याच्या ताब्यातून प्रत्येकी १ किलो वजनाच्या २४ कॅरेटच्या तीन सोन्याच्या विटा जप्त करण्यात आल्या आहे. ट्राउझरच्या खिशात या सोन्याच्या विटा आणण्याचा प्रवाशाचा होता प्रयत्न होता. मात्र कस्टम विभागाने या आरोपीला तब्यात घेतलं आहे. हे सोनं नेमक कशासाठी भारतात आणलं जात होत, याचा काही राजकीय संबंध आहे का याबद्दल आता पुढील तपास सुरू झाला आहे. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात हे सोनं आढळून आल्याने विमानतळ परिसरात खळबळ उडाली आहे.

### बिल्डरच्या घरातून अडीच कोटी जप्त

नवी मुंबईच्या नेरुळमधून एका बिल्डरच्या घरातून तब्बल २ कोटी ६० लाखांची रोकड जप्त करण्यात आलीये. निवडणुकीच्या काळात इतकी मोठी बिल्डरच्या घरातून जप्त करण्यात आलीये. नेरुळ पोलिसांनी ही मोठी कारवाई केलीय. एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांनी याबाबतची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करत ही २ कोटी ६० लाखांची रोकड जप्त केलीय. ही रक्कम कोणत्या उद्देशानं घरात ठेवली होती, याचा तपास पोलीस करतायेत.

# नक्षलवादाला लगाम घालत या भागात आम्ही उद्योग आणले

## चंद्रपुरात मोदींचं भाषण, काँग्रेस, मविआवर हल्लाबोल

**चंद्रपूर (चिमूर): देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचा महाराष्ट्रातील निवडणुकांसाठी प्रचारसभेचा आज दुसरा टप्पा सुरू झाला आहे. मोदींनी धुळ्यातून आपल्या निवडणूक प्रचारसभांना सुरुवात केली. त्यावेळी, संविधान आणि जातीय राजकारणावरुन काँग्रेसला लक्ष्य केलं होतं. तसेच, एक है तो सेफ है... असा नाराही मोदींनी दिला. त्यानंतर, आज विदर्भातील चिमूर मतदारसंघातून मोदींनी महायुतीसाठी प्रचारसभा घेतली. येथील सभेतून त्यांनी थेट महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. विकासाचा अडथळा निर्माण करणारी ही आघाडी म्हणजे बिघाडी आहे. तर, कलम ३७० पुन्हा लागू करण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून होतअसल्याचे सांगत मोदींनी काँग्रेसला लक्ष्य केले. तसेच, आम्ही नलक्षवादाला (Naxal) लगाम लागवल्याने येथील भागात उद्योग येऊ लागले असे मोदींनी म्हटले. दरम्यान, एकीकडे महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवून नेले जात असल्याची टीका महाविकास आघाडीचे नेते करत असताना, मोदींनी नक्षलग्रस्त भागात उद्योग आणल्याचे म्हटले.**

नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला चिमूरच्या क्रांतिकारकांना अभिवादन केलं. बाबुराव शेडमाके यांच्या स्मृतीला देखील अभिवादन केलं. सभेत आलेल्या गर्दीचा विशेष उल्लेख करुन मोदींनी महायुतीने जाहीर केलेल्या भाजपच्या संकल् पत्राचे कौतुक केले. हे संकल्प महाराष्ट्राच्या विकासाची गॅरंटी आहे, असेही मोदींनी म्हटले.



### नक्षलवादाला चाफ लावत चंद्रपुरात उद्योग आणले

चंद्रपूरने अनेक वर्षे नक्षलवाद सहन केला, अनेक तरुणांचे बळी गेले, त्यामुळे या भागात उद्योग येऊ शकले नाहीत. आम्ही नक्षलवादावर लगाम लागली, त्यामुळे या भागात आता उद्योग येत आहेत. करोडो लोकांना पीएम आवास योजनेचा लाभ मिळाला. देशातील २५ कोटी लोकं दारिद्र्याच्यारेषेबाहेर आले, या भागातील चिंनोर तांदुळाच्या उत्तम क्वालिटीचाही मोदींनी आपल्या भाषणात उल्लेख केला. तसेच, महाविकास आघाडीने जलयुक्त शिवार योजना थांबवली, असे म्हणत मोदींनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. हम एक है तो सेफ है.... असे म्हणत मोदींनी सर्वांना एकत्र राहण्याचे आवाहन केले. जर तुम्ही एक राहिला नाहीत, तर काँग्रेस तुमचं आरक्षण काढून टाकेन, असेही मोदींनी म्हटले.

मोदींनी काँग्रेसवर हल्लाबोल करताना म्हटले की, आघाडी म्हणजे भ्रष्टाचाराचे सर्वात मोठे खिलाडी आहेत. जम्मू-कश्मीर अनेक दशकं दहशतवादात होरपळत होता, संविधानाची माळ जपणाऱ्यांनी (पान २ वर)

### गुरुवारी खारघरमध्ये महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पंतप्रधान मोदी यांची भव्य सभा

पनवेल (प्रतिनिधी) - रायगड, ठाणे शहर, नवी मुंबईतील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ गुरुवार दिनांक १४ नोव्हेंबर रोजी दुपारी ०३ वाजता खारघर येथे देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भव्य जाहीर सभा होणार आहे. सेक्टर २९ मधील मधील सेंट्रल पार्क जवळील मैदानात हि सभा होणार आहे. या सभेसाठी ५० हजार मतदार उपस्थित राहण्याची शक्यता असल्यामुळे भव्य व्यासपीठ उभारले आहे. त्याचबरोबर या सभेच्या तयारीबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी करून आढावा घेतला जात आहे.

**पेठपाडा येथे हेलिपॅड –**

खारघर येथील पेठपाडा मेट्रो रेल्वे स्थानकाच्या बाजूला असलेल्या मैदानात हेलिपॅड उभारण्याचे काम सुरू आहे, तसेच या ठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. श्वानपथकाद्वारे या जागेची तपासणी करण्यात येत आहे. सभा सुरळीत पार पडण्यासाठी नवी मुंबई पोलिसांकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

# २८ दिवसांत ४९३ कोटींची मालमत्ता जप्त, ४ हजारांहून अधिक तक्रारींचा निपटारा



मुंबई: विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल पवर एकूण ४ हजार ७११ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४ हजार ६८३ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आली आहे. नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी C-Vigil app) ॲपद्वारे तक्रार करून सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. (सविस्तर वृत्त पान २ वर)

### सर्वाधिक जप्ती कोणत्या भागांत?

- मुंबई- उपनगरे- ७६ कोटी १० लाख
- मुंबई शहरे- ३७ कोटी ४४ लाख
- नागपूर- ३७ कोटी १६ लाख
- अहमदनगर- २९ कोटी ९८ लाख
- पुणे- २६ कोटी ७२ लाख
- रायगड- २१ कोटी ०५ लाख
- धुळे -१८ कोटी ६५ लाख
- पालघर-१८ कोटी १३ लाख
- छत्रपती संभाजीनगर (औ.बाद)- १७ कोटी २७ लाख
- ठाणे-१६ कोटी ४९ लाख
- सातारा- ११ कोटी ३ लाख

# त्यांच्याजवळील विषय संपले, म्हणून आता त्यांची रडारड सुरू

## बॅग तपासण्यावरुन फडणवीसांचा उध्दव ठाकरेंवर हल्लाबोल



कल्याण( गणेश घावटे )- बॅगा तपासल्या तर काय वाईट झाले? त्याचा एवढा इशु करण्याचे कारण नव्हते. प्रचारादरम्यान आपली बॅगही निवडणूक अधिकाऱ्यांनी तपासली असून आम्ही अजिबात रडारड केली नाही. परंतु आता त्यांच्याजवळचे सर्व विषय संपल्यानेच रडारड करून मत मागायचे काम सुरू असल्याचा हल्लाबोल राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उध्दव ठाकरे यांच्यावर केला.

कल्याण पूर्वेतील महायुतीचे उमेदवार सुलभा गणपत गायकवाड यांच्या प्रचारासाठी झालेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. त्यावेळी आपल्या भाषणात फडणवीस यांनी उध्दव ठाकरे, (पान २ वर)

## पदभार स्वीकारताच CJI संजीव खन्ना ॲक्शन मोडमध्ये!

# सुप्रीम कोर्टात आता 'या' गोष्टीवर बंदी

**यवी दिल्ली – सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर जस्टिस संजीव खन्ना ॲक्शन मोडमध्ये आल्याचे पाहायला मिळाले. मुख्य न्यायाधीश पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर तसेच पदावर रुजू झाल्यानंतर त्यांनी अनेक महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख केला. ज्यात नागरिकांप्रती आपली कर्तव्य, कायदे, न्यायव्यवस्थेची जबाबदारी याची माहिती दिली. यावेळी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेल्या एका परंपरेत बदल केला.**

### संजीव खन्ना यांनी सोमवारी घेतली शपथ

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोमवारी राष्ट्रपती भवनात न्यायमूर्ती संजीव खन्ना यांना ५१ वे सरन्यायाधीश म्हणून पदाची शपथ दिली. यावेळी न्यायमूर्ती खन्ना यांनी उपस्थितांशी संवाद साधला. लोकशाहीचा तिसरा स्तंभ असलेल्या न्यायव्यवस्थेचे नेतृत्व करताना मला अत्यंत सन्मान वाटतोय. 'न्यायव्यवस्था हा शासन व्यवस्थेचा अविभाज्य, तरीही स्वतंत्र भाग आहे. संविधानाने आपल्यावर घटनात्मक संरक्षक, मूलभूत हक्कांचे रक्षक आणि न्याय सेवा देण्याची महत्वाची जबाबदारी सोपावली आहे.

### न्यायव्यवस्थेसमोरील आव्हानांचा उल्लेख

प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करणे, खटल्याचा खर्च परवडेल असा करणे, जटिल कायदेशीर प्रक्रिया सुलभ करणे ही आव्हाने न्यायव्यवस्थेसमोर असल्याचे ते म्हणाले. न्याय व्यवस्थेने सर्व नागरिकांच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. न्यायालये अधिक सुलभ आणि वापरकर्त्यांच्यादृष्टीने अनुकूल बनवण्याचा दृष्टिकोनही संजीव खन्ना यांनी यावेळी मांडला.

### तोंडी उल्लेखावर बंदी

सर्वोच्च न्यायालयात आलेल्या प्रकरणांच्या तात्काळ सुनावणीसाठी तोंडी उल्लेखावर बंदी घालण्यात आली आहे. प्रकरणे तात्काळ सुचीबद्ध करण्यासाठी आणि त्यांच्यावर सुनावणीसाठी तोंडी उल्लेख करण्याची परवानगी दिली जाणार नाही. कोणत्याही प्रकरणात तात्काळ सुनावणीसाठी ईमेल किंवा लेखी पत्र पाठवावे लागेल, असे आवाहन त्यांनी वकिलांना केले. सर्वसाधारणपणे वकील तातडीच्या सुनावणीसाठी दिवसाच्या कामकाजाच्या सुरुवातीला CJI-नेतृत्वाखालील खंडपीठासमोर त्यांची प्रकरणे नमूद करतात. पण आता त्यांना यासाठी लेखी किंवा ईमेलचा वापर करावा लागणार आहे.

### तातडीच्या सुनावणीचे कारणही सांगावे लागणार

सुनावणीसाठी आता तोंडी उल्लेख चालणार नाही. हे फक्त ईमेल किंवा लिखित स्लिप/पत्राद्वारे कार्यवाही पुढे जाईल. तात्काळ सुनावणीची गरज असल्याची कारणे द्यावे, असे CJI संजीव खन्ना यांनी सांगितले. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी पदभार स्वीकारल्यानंतर न्यायालयीन सुधारणांसाठी नागरिक-केंद्रित धोरण आखले आहे. न्यायव्यवस्था सहज उपलब्धता करणे आणि त्यांची परिस्थिती काय आहे हे न पाहता नागरिकांना समान वागणूक देणे हे न्यायव्यवस्थेचे घटनात्मक कर्तव्य असल्याचे ते म्हणाले.



### 'मध्यस्थीला प्रोत्साहन देणे महत्वाचे'

नागरिकांना समजण्याजोगे निर्णय घेणे आणि मध्यस्थीला प्रोत्साहन देणे यालाही प्राधान्य असेल.' फौजदारी खटल्यांच्या व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करून खटल्याचा कालावधी कमी करणे, पद्धतशीर दृष्टीकोन अवलंबणे आणि कायदेशीर प्रक्रिया नागरिकांसाठी बोजा होणार नाहीत याची काळजी घेण्यास प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी यावेळी त्यांनी सांगितले. विवादांचे प्रभावीपणे निराकरण करण्यासाठी आणि वेळेवर न्याय देण्यासाठी मध्यस्थीला प्रोत्साहन देण्याचे महत्त्वही संजीव खन्ना यांनी अधोरेखित केले.

### 'लोकांना न्याय मिळवून देणे हे आमचे कर्तव्य'

'समान वागणुकीच्या दृष्टीने, न्याय देताना प्रत्येकाला त्यांचा दर्जा, संपत्ती किंवा शक्ती याची पर्वा न करता यशस्वी होण्याची वाजवी संधी प्रदान करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.आपल्या महान राष्ट्रातील सर्व नागरिकांना न्याय मिळवून देणे हे आपले घटनात्मक कर्तव्य असल्याचे सीजेआय खन्ना यावेळी म्हणाले.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## हवामान बदलाचे संभाव्य धोके

सध्या जगाला हवामान बदलाला सामोरे जावे लागत आहे. याचबरोबर जुने–सुप्त व्हायरस पुन्हा परतण्याचा युरोपला धोका असल्याचा इशारा संशोधकांनी दिला आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे हे व्हायरस, साथीचे रोग गंभीर बनत चालले आहेत. कोरोनाने जगावर मोठे संकट आणले आहे. यामुळे आजवर लाखो लोकांना प्राण गमवावे लागले आहेत. जंगलावर मानवी अतिक्रमणामुळे हे सारे घडत आहे, असा इशारा संशोधकांनी दिला आहे. परिणामी कोरोनासारखीच अन्य मोठी संकटे भवितव्यात ओढवणार आहेत. जगाच्या तापमानात १ डिग्री सेल्सिअसची वाढ झाली आहे. यामुळे ही तापमान वाढ मलेरियास डेग्यू सारख्या रोगांची वाहक बनली आहे. देवी, शीतज्वरासारखे उत्पात माजविलेले व्हायरस पुन्हा परतण्याचा धोका असल्याचे म्हटले आहे. एकूण जागतिक तापमान वाढ रोखण्याचे आव्हान जगासमोर आहे.

स्वीडनच्या उमीया विद्यापीठाच्या मायक्रोबायोलॉजीच्या संशोधक बिर्गिट्टा इव्हनगार्ड यांनी म्हटले आहे की, मानवाने त्याची हद्द पार केली आहे. आपणच आपले शत्रू बनत आहोत. हवामान बदलाचा हा टाईम बॉम्ब रशिया, कॅनडा आणि अलास्काच्या भागात पसरू लागला आहे. कारण जगात जेव्हा औद्योगिकीकरणाचा उगम झाला तेव्हापासून या भागात तिप्पट कार्बन उत्सर्जन झाले आहे. जर मनुष्यवस्तीने २०१५ च्या पॅरिस करारानुसार तापमान दोन डिग्री सेल्सिअसने कमी केले तर हा ध्रुव प्रदेशातील उघडी पडलेली जमीन २१०० पर्यंत पुन्हा बर्फाच्छादीत होईल असे युएनच्या हवामान विभागाने म्हटले आहे. हवामान बदलाचे दृश्य परिणाम जगातील काही ठिकाणी स्पष्टपणे दिसून आले आहेत. जिथे वाळवंट आणि सदोदित तापमान सुमारे ५५ अंश सेल्सियसवर असते, अशा ठिकाणी म्हणजे अल्जेरियाच्या सहारा वाळवंट येथे काही वर्षांपूर्वी बर्फ पडले होते. येथे फेब्रुवारी १९७९ मध्ये पहिल्यांदा हिमवर्षाव पडला होता. जगाच्या थंड वातावरणात हिमवर्षाव होणे हे सामान्य आहे, परंतु जगाच्या अतिशय गरम भागात बर्फवृष्टी होणे हा साधासुधा योग नाही, वर्षानुवर्षे घडणाऱ्या हवामान बदलाचा एक भाग आहे. हवामान बदलाच्या घटनांपासून बचाव करण्यासाठी जगातील प्रमुख देशांनी एकत्र येवून ठोस कार्यक्रम आखला पाहिजे, असे वाटते. पृथ्वीवर कार्बनचे उत्सर्जन रोखणे व नंतर ते खालच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. २०२५ पर्यंत पृथ्वीवरील विकसित देशांनी १९९० च्या कार्बन उत्सर्जनाच्या पातळीमध्ये ४० टक्के कपात करणे आवश्यक आहे. विकसित देशांनी औदयोगिक राष्ट्रांच्या सहकार्याने हे प्रमाण कमी केले पाहिजे. उष्णकटिबंधीय जंगलांना विशिष्ट निधी, तंत्रासह संरक्षित करणे म्हणजेच हवामानासाठी वन ही संकल्पना प्रत्यक्षात राबविणे. दूषित जीवाश्म इंधन निर्मिती केलेल्या उर्जेऐवजी नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जेची कार्यक्षमता वाढवणे हे त्यावर उपाय आहेत. अणुऊर्जासारख्या उपाययोजना नाकारणे आता काळाची गरज बनणार आहे.

जर उपाययोजना वेळेत सोडवली गेली नाही तर आंतरराष्ट्रीय समस्या निर्माण होवून मानव जातीसह सजीव धोक्यात येणार आहेत. केवळ विकसनशील किंवा विकसनशील देश नव्हे, तर जगातील संपूर्ण देशांची ही जबाबदारी आहे. डब्लू–डब्लूएफच्या अभ्यासानुसार, पुढच्या ५० वर्षांत हे जग हवामान बदलाच्या प्रक्रियेत नष्ट होईल. हा पर्यावरणाशी संबंधित शास्त्रज्ञानी दिलेला इशारा आहे. पृथ्वीवरील खनिज, पाणी,वृक्ष संसाधनाची ज्या गतीची मानवाकडून लूट केली जात आहे, ती पस्तीस वर्षांच्या आत जगाच्या लोकसंख्येची गरज पुरवण्यासाठी, पृथ्वीसारख्या किमान दोन ग्रहांवर कब्जा करण्याची आवश्यकता पडेल. जागतिक वन्यजीव निधीच्या (डब्ल्यूडब्ल्यूएफ), पर्यावरणाशी संबंधित संघटनेच्या ताज्या अहवालात, पर्यावरण बिघडण्यासाठी जगातील सर्वात दोषी अमेरिका असल्याचे म्हटले आहे.

डब्ल्यूडब्ल्यूएफच्या अहवालात शास्त्रज्ञ इशारा देतात – मानवाला चंगळवादी जीवनशैली बदलण्याची गरज आहे. वर्ष २०५० पर्यंत ही पृथ्वी आपल्यासाठी निरुपयोगी ठरेल. शास्त्रज्ञ म्हणतात की, १९७० मध्ये सुमारे अडीच लाख टन केड माशांचे उत्पादन झाले, जे १९९५ मध्ये ६० हजार टन एवढे कमी झाले. १९७० ते २००२ च्या दरम्यान, पृथ्वीवरील जंगलाची टक्केवारी १२ टक्क्यांनी कमी झाली आहे. ताजा पाणी साठा ५५ टक्के कमी झाला आहे आणि सागरी जीवन एक तृतीयांश राहिले आहे. डब्ल्यूडब्ल्यूएफच्या अहवालानुसार, हे धोके मानवालाच नव्हे तर सस्तन प्राणी, पक्षी, मासे इ. ना देखील आहेत. गेल्या ३० वर्षांत या प्रजातींची संख्या निम्म्याहून कमी झाली. या अहवालात, सरासरी अमेरिकी नागरिक इतर देशांच्या तुलनेत अनेक पट कार्बन उत्सर्जन करतात आणि अनेक आशियाई व आफ्रिकन नागरिकांच्या तुलनेत वाहने वापरून कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन करतात. पाणी, हवामानाचे नियमन, ऑक्सिजन, ऊर्जा प्रवाह, अन्नसाखळी इत्यादि १५ नैसर्गिक सेवा आम्हाला निसर्गाच्या देणग्यांपासून मिळाल्या आहेत. पृथ्वीवरील तापमान वाढत आहे, जंगलांमधील झपाटयाने कमी होत चाललेली लोकसंख्या, जैविक वैविध्याचे जतन केलेल्या प्रवाळ प्रांतापैकी ४० टक्के संकुचित होणे असे प्रकार घडत आहेत. १९६० पासून नद्या आणि तलावाच्या पाण्यात दोन वेळा वाढ झाली. जीवसृष्टीची प्रजाती नैसर्गिक दरांपेक्षा हजारपेक्षा जास्त वेगाने वेगाने वाढत आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरणाचा विकास आणि कोळसा आणि पेट्रोलियमचा जास्त वापर थांबवणे आवश्यक आहे. लोकसंख्या वाढ, बेसुमार पाणीवापर, जंगलांचा ऱ्हास, वृक्षतोड थांबवणे गरजेचे आहे. वातावरणातील ओझोनच्या थराला छिद्र पडले असून सूर्यप्रकाशातील अतिनील किरणे पृथ्वीवर थेट पडत आहेत. त्यामुळे जमीन तापत आहे, हवा गरम होत असून तापमान वाढ होत आहे. हवामानातील बदलांचा सर्वात मोठा परिणाम गरीब देशांवर होऊ शकतो. हवामान बदलाचा धोका लक्षात घेवून प्रत्येक देशाने, नागरिकाने हवामान बदलाला कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी टाळणे हितावह वाटते.

**जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'**

☆ मिळकट नोटीस ☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस ☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
***DISCLAIMER:** Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

### उत्तर महाराराष्ट्रासह राज्याचे राजकीय गणित काय ?

# बंडखोर उमेदवारांमुळे राज्यातील सत्तेची सूत्र बदलणार ?



**आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्याच्या राजकारणात मोठ्या हालचाली होताना दिसत आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाड्या मैदानात उतरल्या आहेत. तर आज अनेक राजकीय पक्षांनी आपले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवत ही निवडणुक अधिक रंगतदार केली आहे. दरम्यान या निवडणुकांच्या रणधुमाळीत अनेक मतदारसंघात बंडखोरी झाल्याचेही दिसून आले आहे. दरम्यान या बंडखोर उमेदवारांमुळे राज्यातील सत्तेची सूत्र बदलणार का ? की या बंडखोरीचा मविआ आणि महायुतीपैकी कोणाला फटका बसतो तर कोणाला फायदा होतो हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे. दरम्यान बंडखोर उमेदवारांमुळे उत्तर महाराराष्ट्रासह राज्याचे राजकीय गणित काय हे जाणून घेऊया.**

**नाशिक जिल्हा –** महायुती: नाशिक जिल्ह्यात महायुती मध्ये नांदगाव, देवळाली, चांदवड या तीन ठिकाणी तर महाविकास आघाडीमध्ये इगतपुरी या एका ठिकाणी बंडखोरी झाली आहे. ज्यात नांदगाव मधील बंडखोर उमेदवार समीर भुजबळ यांच्यामुळे नांदगाव येथील महायुती शिंदे गटाचे उमेदवार सुहास कांदे हे अडचणीत आले आहे. नांदगाव येथे समीर भुजबळ यांच्या बंडखोरीमुळे तिरंगी लढत होणार असून फटका महायुतीचे उमेदवार सुहास कांदे यांनाच बसणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

देवळाली विधानसभा मतदारसंघात महायुतीने दोन अधिकृत उमेदवार दिले आहे. अजित पवार गटाकडून सरोज आहेत तर, शिंदे गटाकडून राज्यश्री अहिरराव उमेदवारी करत आहे. महायुतीतील या दोन मैत्रीपूर्ण लढतीमुळे महाविकास आघाडीचे उमेदवार योगेश घोलप यांना फायदा होण्याची शक्यता आहे तर, महायुतीच्या दोन उमेदवारांचा विजयाचा मार्ग मात्र अडचणीत सापडणार असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

तसेच चांदवड विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार राहुल आहेर यांच्याविरोधात त्यांची बंधू केदा आहेर यांनी बंडखोरी केली आहे त्यामुळे महायुतीचे उमेदवार राहुल आहेर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे तर, चांदवड मतदार संघातून महाविकास आघाडीने काँग्रेसचे शिरीष कोतवाल हे उमेदवारी करत आहे त्यामुळे युतीच्या उमेदवाराची अडचण वाढली आहे.

### महाविकास आघाड

इगतपुरी विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे उमेदवार लकी जाधव यांच्या विरोधात ठाकरेंच्या शिवसेनेकडून माजी आमदार निर्मला गावित यांनी बंडखोरी केली आहे त्यामुळे महाविकास आघाडीचा उमेदवार अडचणीत आला असून महायुती अजित पवार गटाचे उमेदवार हिरामण खोसकर यांचा विजयाचा मार्ग सुखकर झाल्याचं बोललं जात आहे.

### जळगाव जिल्हा

जळगाव शहर मतदारसंघात महायुतीमधे भाजपचे अश्विन सोनावणे यांनी बंडखोरी केली आहे. याच मतदारसंघात महाविकास आघाडीचे शिवसेनेचे कुलभूषण पाटील यांनी बंडखोरी केली आहे. तर अमळनेर मतदार संघात महायुतीमधे शिरीष चौधरी यांनी बंडखोरी केली आहे. पाचोरा मतदार संघात महायुतीमध्ये भाजपचे अमोल शिंदे तर महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादीचे माजी आ. दिलीप वाघ यांनी बंडखोरी केली आहे. एरंडोल मतदार संघात
महाविकास आघाडीमधे शिवसेनेचे डॉ. हर्षल माने तर, महायुतीमधे अजित पवार गटाचे डॉ. संभाजी पाटील यांनी बंडखोरी केली आहे

**धुळे जिल्हा –** धुळे जिल्ह्यातील ५ विधानसभा मतदार संघात महायुतीमध्ये १ बंडखोरी झाली आहे. तर महाविकास आघाडीमध्ये ३ ठिकाणी बंडखोरी आणि १ मैत्रीपूर्ण लढत होत आहे. धुळे शहर विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडी मधील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि समाजवादी पार्टी यांच्यात मैत्रीपूर्ण लढत होत आहे..



धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे हिलाल माळी यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी केली आहे. शिंदखेडा विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष श्याम सनेर यांनी अपक्ष उमेदवारी करत बंडखोरी केली आहे. साक्री विधानसभा मतदारसंघात भाजपचे मोहन सूर्यवंशी यांनी अपक्ष उमेदवारी करत बंडखोरी केली आहे. शिरपूर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे डॉक्टर जितेंद्र ठाकूर यांनी अपक्ष उमेदवारी करत बंडखोरी केली आहे.

**नंदुरबार जिल्हा**
महायुती – १
महाविकास आघाडी – ०
जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघातील फक्त एका मतदारसंघात महायुतीत बंडखोरी झाले आहे
**१ अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघ**
महायुतीच्या नेत्यां भाजपच्या माजी खासदार हिना गावित यांनी शिंदे गटाच्या उमेदवाराच्या विरोधात बंडखोरी केले आहे
महायुती बंडखोरी आणि मैत्रीपूर्ण लढाई –
**अहिल्यानगर ( उत्तर नगर जिल्हा )**

### श्रीरामपुर विधानसभा –

राष्ट्रवादी अजीत पवार पक्षाचे लहू कानडे तर शिवसेना शिंदे गटाकडून भाऊसाहेब कांबळे हे निवडणुक मैदानात आहेत त्यामुळे महायुतीत दुफळी निर्माण झाली असुन या मतदारसंघात महायुतीला फटका बसण्याची शक्यता आहे.कानडे आणि कांबळे या दोघांना पक्षाचे एबी फॉर्म दिले आहेत माघारीच्या दिवशी अर्ज माघारी न घेतल्याने मरायुतीत पेच निर्माण झाला...दोन्ही उमेदवार आपल्या प्रचारात व्यस्त आहेत..तर काँग्रेसकडून हेमंत ओगले यांना उमेदवारी देण्यात आलीय...

### नेवासा विधानसभा –

नेवासा विधानसभा मतदारसंघात भाजपचे माजी आमदार बाळासाहेब मुरकूटे यांनी बंडखोरी केलीय....ते प्रहारकडून निवडणुक मैदानात आहेत...तर भाजपचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे यांना शिवसेना शिंदे गटाची उमेदवारी मिळाली आहे.बंडखोरीचा फायदा ठाकरे गटाचे उमेदवार विद्यमान आमदार शंकरराव गडाख यांना होवू शकतो त्यामुळे महायुतीत डोकेदुखी वाढली आहे.

### अकोले विधानसभा

– अकोले विधानसभा मतदारसंघात अजीत पवार गटाकडून विद्यमान आमदार डॉ.किरण लहामटे , शरद पवार गटाकडून अमित भांगरे हे उमेदवार आहेत...भाजपचे माजी आमदार वैभव पिचड यांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केल्याने आणि प्रचाराचा धडाका सुरू केल्याने किरण लहामटेंची डोकेदुखी वाढली आहे. महायुतीला फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**अहिल्यानगर (दक्षिण)** – श्रीगोंदा मतदारसंघात राष्ट्रवादी (SP) माजी आमदार राहुल जगताप यांनी बंडखोरी केली त्यामुळे मविआची अडचण झाली आहे...तिथे शिवसेना ठाकरे गटाच्या अनुराधा नागवडे उमेदवार आहेत. पारनेरमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले यांनी बंडखोरी केली. पारनेरमध्ये राष्ट्रवादी (SP) च्या राणी लंके या उमेदवार आहेत. शेवगाव–पाथर्डीत राष्ट्रवादी (AP) चे माजी आमदार चंद्रशेखर घुले यांनी बंडखोरी केली त्या ठिकाणी महायुतीच्या उमेदवार भाजपच्या आ. मोनिका राजळे या आहेत.

# 'एक' राहिलो तरच देश विकासाकडे वाटचाल करणार

### हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांचे प्रतिपादन

ठाणे – देशाचे तुकडे करायची भाषा करणाऱ्याच्या सोबत काँग्रेस आहे. देशाला तोडण्याचे, समाजा समाजात फूट पाडण्याचे काम काँग्रेसने केले आहे. तेव्हा 'एक' राहीलो तरच देश विकासाकडे वाटचाल करणार आहे. असे प्रतिपादन हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात आलेल्या मुख्यमंत्री सैनी यांनी मंगळवारी (ता.१२ नोव्हे.) ठाण्यातील भाजप मिडिया सेंटरमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी भाजपचे हरियाणा येथील खासदार डॉ. हेमांग जोशी, भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, प्रदेश प्रवक्ते सुजय पत्की, मा. नगरसेविका मृणाल पेंडसे, महामंत्री सचिन पाटील, डॉ. समिरा भारती आदी उपस्थित होते. हरियाणामध्ये जनतेने तिसर्यांदा भाजपला बहुमत दिले यात गरिबांचा वाटा मोठा आहे. काँग्रेस खोटी आश्वासने देऊन मत विभागणी करते आणि नंतर गरिबांचे शोषण करते हा त्यांचा पूर्वइतिहास आहे. काँग्रेसने हिमाचल प्रदेश, कर्नाटक, तेलंगणामध्ये आश्वासने दिली पण त्याची पूर्तता केली नाही. लोकसभा निवडणुकीत देखील काँग्रेसने संविधानाबाबत खोटा प्रचार करून नागरिकांची दिशाभुल केली. काँग्रेस खोटे बोलते... खोटे वायदे करते, काँग्रेसच्या चौथी पिढीचे युवराज यांना संविधानात किती पाने आहेत तेदेखील माहित नाही. लाडकी बहिण योजने विरोधात ते कोर्टात गेले आहेत. पण भाजपने आपल्या संकल्प पत्रात निधी वाढवण्याचा संकल्प केल्याचे मुख्यमंत्री सैनी यांनी सांगितले. काँग्रेस ओबीसींचा वापर करते आणि ओबीसी समाजाला मोदींनी सन्मान दिल्याने ओबीसी प्रगती करीत आहेत. तेव्हा काँग्रेस बॅकफुटवर असुन महाराष्ट्रातील जनता दुसऱ्यांदा महायुतीला निवडून देणार आणि यांना बाहेरचा रस्ता दाखवणार असल्याचा विश्वास सैनी यांनी व्यक्त केला.

पुढे बोलताना मुख्यमंत्री सैनी यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एक है तो सेफ है चे समर्थन करताना एक राहिलो तरच देश विकासाकडे वाटचाल करणार असल्याचे सांगितले. १९४७ ला पहिल्यांदा काँग्रेसने देशाचे तुकडे केल्याचे सांगितले. हा देश मुस्लिमांचा आहे, अल्पसंख्यांकांचा आहे हे त्यांच्याच पंतप्रधानांनी म्हटले होते, याचे पुरावे उपलब्ध असल्याचे सांगितले. आता भारत जोडोच्या नावाखाली राहूल गांधी, देश कमजोर करणाऱ्यांना सोबत घेतात. देशाचे तुकडे करायची भाषा करणाऱ्याच्या सोबत काँग्रेस आहे. देशाला तोडण्याचे, समाजा समाजात फूट पाडण्याचे काम काँग्रेसने केले आहे. हरियाणात देखील काँग्रेसने जातीयवाद पेरला पण तिथे डाळ शिजली नाही. तेव्हा, महाराष्ट्रातही त्यांच्या राजकिय दुकानदारीला चाप लागून सुपडा साफ होणार असल्याचे भाकीत मुख्यमंत्री सैनी यांनी केले.

# २८ दिवसांत ४९३ कोटींची मालमत्ता जप्त, ४ हजारांहून अधिक तक्रारींचा निपटारा

**मुंबई: विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी–व्हिजिल पवर एकूण ४ हजार ७११ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४ हजार ६८३ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आली आहे. नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी–व्हिजिल (C-Vigil app) ॲप हे कोणत्याही प्लेस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या पद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते असे आयोगाने सांगितले आहे.**

### ४९३ कोटी ४६ लाख रुपयांची मालमत्ता जप्तराज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी....

यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अंमली पदार्थ व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत १५ ऑक्टोबरपासून आजपर्यंत एकूण ४९३ कोटी ४६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे अशी माहिती आयोगाने दिली आहे.

### ७ कोटी ८० लाख कुणाचे ?

मीरा–भाईंदर वसई – विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत तब्बल ७ कोटी ८० लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. यामध्ये नालासोपारा पश्चिमेच्या बस डेपो परिसरात गुन्हे शाखा ३ च्या पथकाने ATM मध्ये पैसे भरणाऱ्या व्हॅन मध्ये ३ कोटी ४८ लाख रुपये जप्त केले. दुसरीकडे मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कनेर फाटा येथे ATM व्हॅनमध्ये २ कोटी ८० लाख रुपये आढळले. तर तिकडे मीरा रोडच्या नया नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत २ एटीएम व्हॅनमधून १ कोटी ४७ लाख रुपयांची रोकड अशी एकूण ७ कोटी ८० लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ही रक्कम नेमकी कुणाची आणि कशासाठी आणण्यात आली होती याबाबतचा तपास पोलीस करत आहेत.

विधानसभा निवडणुकीत मतदारांना अमिष देण्यासाठी बेकायदेशीरित्या काळ्या पैशांची देवाण घेवाण होत असते. त्यासाठी आचारसंहितेच्या काळात रोकड बाळगण्यावर आणि रोकडीची ने–आण करण्यासाठी विशिष्ट नियमावली आखून देण्यात आली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या तशा सूचना पोलीस आणि भरारी पथकाला देण्यात आल्या आहेत. आदर्श आचारसंहितेचं पालन व्हावं यासाठी पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आहे. मीरा, भाईंदर, वसई, विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील नालासोपार्यात एटीएम व्हॅनमधून ३ कोटी ४८ लाख, मांडवी पोलीस ठाणे हद्दीत एटीएम व्हॅनमधून २ कोटी ८० लाख आणि मिरा रोडच्या नया नगरमध्ये दोन एटीएम व्हॅनमधून १ कोटी ४७ लाख रुपयांची रोकड अशी एकूण ७ कोटी ८० लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. कुठल्याही कागदपत्रांशिवाय ही रोकड बाळगण्यात आली होती. ही रोकड जप्त करून त्याची माहिती आयकर विभागाला देण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## त्यांच्याजवळील विषय संपले, म्हणून आता त्यांची रडारड सुरू

**(पान १ वरून)** काँग्रेससह महा विकास आघाडीचा खरपूस समचार घेतला. मार्केटमध्ये तुमचे काही सावत्र भाऊ फिरत आहेत, उध्दव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवाल्या सावत्र भावांनी लाडकी बहिण योजनेविरोधात कोर्टात गेले. मात्र कोर्टाने त्यांना फटकारले आणि ही योजना बंद होणार नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

या महाराष्ट्रात उध्दव ठाकरे यांचे सरकार होते तेव्हा महाराष्ट्राची उद्योग क्षेत्रात अधोगती सुरू होती. मात्र आपले सरकार आले आणि कर्नाटक , गुजरात यांच्यापेक्षा महाराष्ट्र उद्योग गुंतवणुकीत पहिल्या नंबरवर आला. यावर्षी तर एकूण गुंतवणुकीच्या ५२ टक्के गुंतवणूक आम्ही महाराष्ट्रात आणली. आम्ही त्रिमूर्ती त्रिशूळ आहोत, महाराष्ट्राला पुढे नेणारा त्रिशूळ आहे. आम्ही सर्वांनी मिळून संकल्प केलाय विकास हा केंद्रस्थानी आणि देशातील प्रत्येक राज्याला हेवा वाटेल असा महाराष्ट्र बनवण्याचे काम आम्ही करणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. तर उध्दव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका करताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की रडणारे रोज रडत आहेत, रडणाऱ्याना रडू द्या. मात्र आम्ही लढणारे आहेत, रडणाऱ्याना मागे राहू द्या, लढणाऱ्याना तुम्ही साथ द्या असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. तर हा देवाभाऊ गॅरंटी घेतो की कल्याण पूर्वेला एक आदर्श मतदार संघ करण्याचे काम आम्ही करणार आणि सुलभा गायकवाड यांना प्रचंड मतांनी निवडून आणणार.

## भुजबळांनी मर्यादा शिल्लक ठेवल्या नाहीत– येवल्यातून शरद पवारांचा हल्लाबोल

**(पान १ वरून)**आमच्या सहकाऱ्याने पक्ष फोडला, तेव्हा भुजबळ सकाळी आले, जे झालं ते वाईट झालं, समजूत काढायला जाऊ का असं मला विचारलं. भुजबळ साहेब गेले ते परत आलेच नाही, आणि दुसऱ्या दिवशी शपथच घेतली, असे म्हणत भुजबळांवर जोरदार हल्लोबल केला. एखाद्या माणसानं चुकीचे काम करताना काही मर्यादा असतात, त्या भुजबळ यांनी शिल्लक ठेवल्या नाहीत, अशा लोकांना पुन्हा निवडुन द्यायचं नाही हा विचार तुम्ही करायचा आहे. मी याआधी इथे आलो होतो, तुम्ही या ठिकाणी परिवर्तन करणार आहात, इथे अनेक लोक इथे आले आहेत, ज्यांनी नेतृत्वाला फसवले असे म्हणत शरद पवारांनी छगन भुजबळ आणि अजित पवारांना लक्ष्य केले. तसेच, येवलेकरांना भावनिक सादही घातली. मी पूर्ण ताकदीने तुमच्या मागे उभे राहिलो, मला आनंद आहे, प्रचंड प्रतिसाद तुम्ही दिला. ही लढाई आपण प्रचंड मतांनी जिंकू जिंकू जिंकू, असा विश्वासही शरद पवारांनी व्यक्त केला.

## नक्षलवादाला लगाम घालत या भागात आम्ही उद्योग आणले

**(पान १ वरून)** सात दशकं बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान कश्मीरमध्ये लागू होऊ दिलं नाही. मात्र, मोदी सरकारने जम्मू काश्मीरमधील कलम ३७० हटवून काश्मीरमधील लोकांचं भारताशी नातं जोडलं. देशात ७० वर्षांपासून दोन संविधान होते, जोपर्यंत मोदी आला नाही, तोपर्यंत देशात दोन संविधान होते. एक संपूर्ण देशात आणि दुसरं जम्मू काश्मीरमध्ये होतं. जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री आणि येथील उच्च न्यायालयातील न्यायाधीश संविधानाची शपथ घेत नव्हते. कारण, ३७० कलम लागू असल्याने ही मोठी अडसर होती. मात्र, आपल्या आशीर्वादाने मोदी सरकार आल्यानंतर आम्ही कलम ३७० हटवले. पण, काँग्रेसवाल्यांना हे पचनी पडत नाही, म्हणूनच तेथील सरकार काँग्रेससह पुन्हा एकदा कलम ३७० लागू करण्याचा प्रस्ताव विधानसभेत मंजूर करत आहेत, असे म्हणत मोदींनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.

# उद्धव ठाकरे यांच्या बॅगांची दुसऱ्यांदा तपासणी

लातूर : विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक यंत्रणा अलर्ट झाली असून पोलीस कर्मचाऱ्यांसह निवडणूक आयोगाचेही कर्मचारी डोळ्यात तेल घालून काम करत आहेत. शिवसेना युबीटी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बॅग निवडणूक अधिकाऱ्यांकडून तपासण्यात आली होती. यवतमाळ जिल्ह्यातील वणी मतदारसंघात प्रचारासाठी गेल्यानंतर हेलिपॅडवरच उद्धव ठाकरेंची (Uddhav thackeray) बॅग तपासणी करण्यात आल्याने ते चांगलेच संतापले होते. तसेच, माझ्यासह मिंधे, मोदी आणि देवेंद्र फडणवीसांचीही बॅग तपासणी केल्याचे व्हिडिओ मला पाठवा, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. त्यानंतर, आज पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंची बॅग तपासणी करण्यात आली आहे. त्यानंतर, उद्धव ठाकरेंनी संताप व्यक्त करत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची सरबत्ती केली. तसेच, त्यांचे आयडी आणि अपॉईंटमेंट लेटरही दाखवण्याचं बजावलं. या घटनेचा व्हिडिओ स्वत: उद्धव ठाकरेंनी शुट केला असून तो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

उद्धव ठाकरे शिवसेना ठाकरे गटाचे औसा मतदारसंघातील उमेदवार दिनकर माने यांच्या प्रचारासाठी आले असता निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांकडून त्यांची बॅग तपासण्यात आली आहे. त्यावरुन, उद्धव ठाकरेंनी संताप व्यक्त केला आहे. तसेच, आत्तापर्यंत किती जणांची बॅग तपासली असा सवाल संबंधितांना केला. त्यावर, तुम्हीच पहिले आहात असे उत्तर कर्मचाऱ्यांनी दिले असता, दरवेळेला मीच पहिला गिऱ्हाईक का, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी कर्मचाऱ्यांचा व्हिडिओ स्वत:च शुट केला. औसा मतदारसंघात उद्धव ठाकरेंची जाहीर सभा होत असून या सभेसाठी उद्धव ठाकरे औसा मतदारसंघातील नियोजित हेलिपॅडवर आले असता निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी त्यांची बॅग तपासणी केली. विशेष म्हणजे काल सोमवारीच त्यांची बॅग तपासल्याने मोठा राडा झाल्याचं पाहायला मिळालं. राज्यभरातून महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून या घटनेचा निषेध करण्यात आला होता. मात्र, आज पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्या बॅगची तपासणी करण्यात आली आहे. त्यामुळे, शिवसेना ठाकरे गटाचे नेते संतापले आहेत. विशेष म्हणजे यापूर्वी महाविकास आघाडीच्या सभेला जातानाही उद्धव ठाकरेंनी सुरक्षा रक्षकांना सुनावलं होतं. दरम्यान शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी सत्ताधारी व निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली आहे. दरम्यान, औसा येथील मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार अभिमन्यू पवार आहेत. त्यांच्याविरुद्ध ठाकरेंचे दिनकर माने मैदानात आहेत.

### भास्कर जाधवांची प्रतिक्रिया

हे खूप संतापजनक आहे. देशातील लोकशाही संपुष्टात येतेय की काय? असा प्रश्न पडतोय.हा महाराष्ट्रातल्या माणसांचा अपमान असल्याची प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते भास्कर जाधव यांनी दिले. केवळ विरोधकांच्या बॅगा का तपासता? अजित पवार यांची राष्ट्रवादी, भाजपच्या बॅगा का तपासल्या जात नाही? असा प्रश्न भास्कर जाधव यांनी विचारला.



### संजय राऊतांची टीका

उद्धव ठाकरे बॅग तपासणीवर संजय राऊत यांनी टिका केली आहे. लोकसभेच्या वेळी मी स्वत: हा व्हिडीओ केलाय. एका तासासाठी मुख्यमंत्री नाशिकमध्ये प्रचारसभेला आले होते. त्याच्या हेलिकॉप्टरमधून १५ ते १६ बॅगा उतरल्या. एका तासासाठी एवढे कपडे घेऊन जातो का माणूस? शिंदे शिर्डीला प्रचाराला गेले होते तेव्हा त्यांच्या विमानातून उतरलेल्या बॅगांचा व्हिडीओ आम्ही प्रसारित केला होता ना? त्या बॅगा कसल्या होत्या? दोन तासासाठी एका हॉटेलात थांबले आणि इतक्या बॅगा? याचा अर्थ काय? आमच्या करता तपासण्या यांच्या कधी करणार? असा सवाल संजय राऊतांनी विचारला. तसेच पुढे बोलताना, यंत्रणा विकत घेतली आहे? खोके तुम्हालाही पोहोचले आहेत का? असं राऊत यांनी विचारलं.कोण कुठे कसं पैशाचं वाटप करतेय हे आम्ही आतापर्यंत सांगत आलो आहोत. एकनाथ शिंदेंच्या लोकांना २५-२५ कोटी रुपये पोहोचले. सांगोल्यात काही नाक्यावर १५ कोटी पकडले. पण फक्त पाच कोटी दाखवले. उरलेले १० कोटी कुठे आहेत? कोणाचे ते सांगितले का? गाडी कोणाची? कोण होतं गाडीत आम्हाला माहितीये. पैसे कोणाचे होते? कुठे गेले सांगितलं का? असा सवाल संजय राऊत यांनी उपस्थित केला. तसेच पुढे बोलताना त्यांनी, उद्धव ठाकरेंची तपासणी करण्याला आक्षेप नाही. सर्वांना समान न्यायानं निवडणूक आयोगाने वागवलं पाहिजे. मुख्यमंत्री, गृहमंत्री असतील सर्वांना समान वागवा. प्रधानमंत्र्यांच्या ताफ्यातून, अमित शाहांच्या ताफ्यातून बॅगा उतरत नाहीत का? त्या कसल्या बॅगा असतात? असा सवालही राऊत यांनी विचारला.

## उद्धव ठाकरे यांच्या बॅग तपासणी काय म्हणाले शरद पवार?



उद्धव ठाकरे यांच्या बॅग तपासणीच्या प्रकरणावर शरद पवार यांनी प्रतिक्रिया देताना म्हटलं, सत्ता त्यांच्या हातात आहे, सत्तेचा कसा उपयोग करायचा हे त्यांच्या ठरवलेलं आहे, विरोधकांना त्रास देण्याचा हा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न आहे, त्यांचा त्रास सहन करावा लागेल. यावर नाराजी व्यक्त करणं आवश्यक आहे. सामान्य लोकांना ही कळतं, विरोधकांना असा त्रास देणं लोकांना ही फारसे आवडेल असे नाही, मात्र या गोष्टीचा निवडणुकीवर परिणाम होईल असे नाही, असंही शरद पवारांनी यावेळी म्हटलं आहे..

### मोदींच्या सभेवर शरद पवारांची प्रतिक्रिया


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभा राज्यभरात होत आहेत, त्याबाबत बोलताना शरद पवार म्हणाले, 'राज्यात जास्त सभा होत असतील तर चांगले आहे. कारण लोकसभेच्या वेळेस ते सोळा ठिकाणी आले. त्या पैकी अकरा जागांवर पराभव झाला होता, सभा घेणे लोकशाहीमध्ये त्यांचा अधिकार आहे'.


'दादाच किंगमेकर' ठरणार म्हणणाऱ्या

## नवाब मलिकांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता

**मुंबई : विधानसभा निवडणूक तोंडावर असताना राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. यंदाच्या निवडणुकीनंतर अजित दादा किंगमेकर ठरणार असल्याचं मलिक म्हणाले होते. माध्यमांना दिलेल्या मुलाखतीमध्ये मलिकांनी अनेकवेळा हे विधान केले होते. अशातच नवाब मलिक यांचा जामीन रद्द करण्यासाठी ईडीने हायकोर्टात याचिका दाखल करत त्यांना मोठा धक्का दिलाय. मात्र ईडीने मलिकांविरोधात याचिका का दाखल केली जाणून घ्या.**

### अजित पवारांचीही डोकेदुखी वाढली





नवाब मलिक यांच्यावर ईडीने मनी लॉन्ड्रिंगच्या गुन्हा दाखल केला होता. काही दिवसांनी मलिकांना सर्वोच्च न्यायालयाने मलिकांना वैद्यकीय कारणासाठी तात्पुरता जामीन मंजूर केलेला आहे. परंतु तो जामीन रद्द करून नियमित जामिनासाठी मलिक यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली ती फेटाळून लावावी, अशी मागणी ईडीकडून हाय कोर्टात करण्यात आलेली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने मलिकांना वैद्यकिय जामीन देताना स्पष्ट केलेलं होतं की, हा जामीन फक्त वैद्यकिय उपचारासाठी असेल पण मलिक विधानसभा निवडणुकीमध्ये उतरले असून ते जोमाने प्रचार करत असून माध्यमांना मुलाखतही देत आहेत. आपले अवयव निकामी झाले असून तातडीच्या उपचाराची गरज आहे, असा दावा मलिकांनी केला होता. उच्च न्यायालयात मलिकांच्या जामिनासाठीची याचिका प्रलंबित असेपर्यंत म्हणजेच उच्च न्यायालय यावर जोपर्यंत निकाल देत नाही तोपर्यंत हा जामीन कायम राहिल असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं होतं. आता मलिकांची प्रकृती पाहता त्यांना वैद्यकिय जामिनाची गरज नाही, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या तात्पुरत्या जामिनाचा ते गैरवापर करण्यात आला असा दावा ईडीने केला आहे.

दरम्यान, यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये नवाब मलिक उतरले असून मानखुर्द शिवाजीनगरमधून ते निवडणूक लढवणार आहेत. तर त्यांची मुलगी सना मलिक अणुशक्तीनगर या मतदारसंघातून उतरली आहे. मात्र आता ईडीने दाखल केलेल्या याचिकेमुळे लवकरच सुनावणी होण्याची शक्यता आहे. भाजपचा विरोध असतानाही अजित पवार यांनी नवाब मलिक यांना उमेदवारी दिली आहे. महायुती त्यांचा प्रचार करणार नसल्याचं स्पष्टपणे सांगितलं असलं तरी दादांनी मलिकांना तिकीट दिले आहे.



## विक्रोळीतील राज ठाकरेंच्या सभेला संजय राऊतांना निमंत्रण; एक जागा रिकामी ठेवणार

राज ठाकरेंची आज विक्रोळीमध्ये सभा होत आहे. या सभेला ठाकरे गटाचे राज्यसभा खासदार संजय राऊत यांना निमंत्रण देण्यात आले आहे. राऊत यांच्यासाठी व्यासपीठावर एक खूर्ची रिकामी ठेवणार असल्याचेही मनसेने जाहीर केले आहे.

मनसे नेते मनोज चव्हाण यांनी ही माहिती दिली आहे. विक्रोळीमध्येराज ठाकरे यांची सभा आहे, संजय राऊत यांना जाहीर निमंत्रण करतो की त्यांच्यासाठी सभेत एक खूर्ची रिकामी ठेवली जाणार आहे. तुमच्यासारखे शिकले सवरलेले व्यक्ती आहेत, प्रवक्तेपदाच्या माध्यमातून तुमच्या डोक्याला जो गंज चढला आहे. जे बेताल बोलणे सुरु आहे, ते बोलणे कसे असले पाहिजे. वकूब असला पाहिजे. राज ठाकरेंचे विचार, राजकीय माणसाचे विचार कसे असले पाहिजे हे ऐकण्यासाठी या, असे चव्हाण म्हणाले.

तसेच तुम्ही तुमची पातळी सोडून प्रवक्तेगिरी करायला लागला आहात. ही पातळी पूर्वपदावर येण्यासाठी राज यांची सभा ऐकणे गरजेचे आहे. विचारांची देवाणघेवाण कशी असावी हे शिकण्यासाठी तुम्ही आजच्या विक्रोळीच्या सभेला यावे अशी आमची विनंती आहे. तुमच्यासाठी खूर्ची मोकळी ठेवलेली आहे, असे चव्हाण म्हणाले.

## मनोज जरांगेंची मोठी घोषणा! म्हणाले 'तयारीला लागा आता...', तारीख करणार जाहीर

राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असून, प्रचाराचा धुरळा उडाला आहे. राज्यातील सर्व मोठे नेते सध्या प्रचारात व्यग्र असून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. महाविकास आघाडी आणि महायुती आमने-सामने असून आपली सत्ता यावा यासाठी मतदारांना आवाहन करत आहेत. दरम्यान या निवडणुकीत लोकसभेप्रमाणे मराठा आरक्षण समर्थकांचा प्रभाव पडणार का? याची चिंता अनेक नेत्यांना आहे. मनोज जरांगे यांनी निवडणूक लढणार नसलो तरी काही नेत्यांना पाडणार असल्याचा इशाराही दिला आहे. त्यातच आता त्यांनी एक मोठं विधान केलं आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगेंनी पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिला आहे. सामूहिक आमरण उपोषणाची तयारी सुरू करा, असं आवाहन जरांगेंनी मराठा समाजाला दिलं आहे. मनोज जरांगे जालनाच्या अंतरवाली सराटीत पुन्हा उपोषण सुरू करणार आहेत. विधानसभा निवडणूक झाल्यानंतर तारीख जाहीर करणार असल्याचंही मनोज जरांगेंनी स्पष्ट केलं आहे. तर हे भारतातलं सर्वात मोठं आमरण उपोषण असल्याचं जरांगेंनी सांगितलं आहे.

आपल्या गावागावात आमरण उपोषणासंबंधी बैठका सुरु करा. सरकार स्थापन झाल्यानंतर आपण तारीख जाहीर करणार आहोत. आजपासून मराठा समाजाने बैठका सुरु केल्या तरी चालेल. हा ऐतिहासिक लढा असून सर्वात मोठं उपोषण असेल असं मनोज जरांगे म्हणाले आहेत.

### मनोज जरांगेंचा पुन्हा सामूहिक उपोषणाचा इशारा



**राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असून, प्रचाराचा धुरळा उडाला आहे. यादरम्यान मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मोठं विधान करत इशारा दिला आहे.**

दानवेंनी लाथ मारली,तो कार्यकर्त्यासाठी सन्मान असला तरी तो अवमानच असल्याचं सांगत मनोज जरांगे यांनी रावसाहेब दानवे यांच्यावर टीका केली आहे. बबनराव लोणीकर यांचं मराठा समाजाच्या बाबतीत असलेलं वक्तव्य खेदजनक असून यांना रस्त्यावर आणायची ताकद मराठ्यांमध्ये आहे असा इशाराच मनोज जरांगे यांनी दिला आहे.


मी समाजाच्या आरक्षणासाठी लढता लढता मरणार असं सांगत मनोज जरांगे यांनी सरकार कुणाचंही येवो त्यांच्यासमोर आमचं आव्हान असेल असं स्पष्ट केलं आहे.

निवडणुकीच्या रणधुमाळीत सेलिब्रेटींची हवा,

## वर्षा उसगांवकरही एकनाथ शिंदेंसाठी प्रचाराच्या मैदानात!

राज्यात अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकांसाठी कंबर कसून प्रत्येक राजकीय पक्षाचा प्रचार सुरु आहे. वार-प्रतिवार, बेधडक भाषणं, ठसठशीत मुद्दे अशा सगळ्याच गोष्टी सध्या सुरु आहेत. त्यातच आता राजकीय पक्षांच्या प्रचारांसाठी स्टार प्रचारक देखील मैदानात उतरले आहेत. भाऊ कदम, कुशल बद्रिके आणि आता वर्षा उसगांवकर देखील प्रचाराच्या मैदानात उतरल्या आहेत.

जालन्यातील घनसावंगी मतदारसंघांमध्ये मराठी अभिनेत्री वर्षा उसगावकर यांचा रोड शो आयोजित करण्यात आला होता. शिवसेना उमेदवार हिकमत उढाण यांच्या प्रचारार्थ घनसावंगी शहरात रॅली काढण्यात आली होती. या रॅलीतून वर्षा उसगावकर ने हिकमत उढाण यांना मतदान करण्याच आवाहन केलं. घनसावंगी मतदारसंघ यावेळी राष्ट्रवादीचे उमेदवार राजेश टोपे विरुद्ध शिवसेनेचे उमेदवार हिकमत उढाण असा सामना रंगला आहे. महाराष्ट्राच्या राजकीय लढतीचा निकाल हा अवघ्या काही दिवसांतच स्पष्ट होईल. पण त्याआधी मतदारांना आल्या बाजूने वळवण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्षाचे अगदी कसोशीचे प्रयत्न सुरु आहेत. त्यातच त्यंन आकर्षित करण्याठी सेलिब्रेटींच्याही रोड शोचं आयोजन केलं जाणार आहे. त्यामुळे आता सेलिब्रेटींच्या या भूमिकेचा राजकीय पक्षांना फायदा होणार का हे येत्या २३ नोव्हेंबर रोजी स्पष्ट होईलच.



### भाऊ कदमही घड्याळ घरोघरी पोहचवणार



चला हवा येऊ द्या फेम अभिनेता भाऊ कदमही राष्ट्रवादी अजित पवार गटाचा स्टार प्रचारक म्हणून काम करणार आहे. नुकतच भाऊ कदम अजित पवारांसाठी स्टार प्रचारक म्हणून मैदानात उतरला आहे. सयाजी शिंदे यांच्यानंतर भाऊ कदमही अजित पवारांच्या रॅलीमध्ये दिसणार आहे. अजित पवारांची लाडकी बहीण योजना यासह विविध योजनांची माहिती भाऊ कदम प्रचार रॅलीत सहभागी होऊन सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणार असल्याची माहिती मिळत आहे.

### शायना एनसींच्या रॅलीत कुशल बद्रिके

भाजपमधून शिंदे गटात प्रवेश करत शायना एनसी यांनी मुंबादेवी मतदारसंघाचं तिकीट मिळवलं. त्यामुळे शायना एनसी आता धनुष्यबाण या चिन्हावर विधानसभेसाठी मैदानात उतरल्या आहेत. त्यांच्याच प्रचार रॅलीमध्ये त्यांच्यासोबत अभिनेता कुशल बद्रिके देखील होता. त्यामुळे कुशलही आता प्रचाराच्या मैदानात उतरल्याचं पाहायला मिळतंय.



## सकल मराठा समाजाचा प्रहार जनशक्तीच्या धनंजय गावडे यांना जाहीर पाठिंबा

नालासोपारा - महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीत १३२ - नालासोपारा विधानसभा मतदारसंघाचे प्रहार जनशक्ती पक्ष व परिवर्तन महाशक्ती आघाडीचे अधिकृत उमेदवार धनंजय विठ्ठल गावडे यांना वसई तालुका सकल मराठा समाज संस्थेने पाठिंबा जाहिर केला आहे. संस्थेचे अध्यक्ष शिरीष चव्हाण, सचिव संजय पाटील आणि उपाध्यक्ष उदय जाधव यांनी पाठिंब्याचे पत्र गावडे यांना दिले आहे. उपाध्यक्ष उदय जाधव, सचिव संजय पाटील, कल्पेश सकपाळ, जयसिंग खबाले, लक्ष्मण पाटील यांनी गावडे यांची प्रत्यक्ष भेट घेतली होती. सकल समाज कार्यकारिणीच्या मासिक बैठकीत धनंजय गावडे यांना जाहिर पाठिंबा देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. तसेच समाजाच्या वतीने समाज बांधवांना गावडे यांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष शिरीष चव्हाण, उपाध्यक्ष उदय जाधव, सचिव संजय पाटील यांनी दिली. धनंजय गावडे नेहमीच मराठा समाजाच्या सोबत राहिले आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावा यासाठी पालघर जिल्हयात झालेल्या आंदोलनांमध्ये गावडे सहभागी झाले होते. मराठा समाजाच्या उन्नतीसाठी सदैव प्रयत्नशिल राहू, अशी ग्वाही गावडे यांनी सकल मराठा समाजाला दिली आहे.

## विधानसभेनंतर शिक्षण आणि नोकऱ्यांतील आरक्षण जाणार, प्रकाश आंबेडकरांचा खळबळजनक दावा

**बीड - स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने थांबवण्यात आले आहे. उद्या विधानसभेच्या माध्यमातून शिक्षण आणि नोकऱ्या यामधील आरक्षण थांबवले जाईल. हे आपल्याला मान्य आहे का? मान्य नसल्यास किंतु, परंतुची चर्चा न करता वंचित बहुजन आघाडीने उभे केलेले ओबीसींचे, एससी, एसटी आणि मुस्लीम उमेदवार की ज्यांची निशाणी गॅस सिलिंडर आहे त्यांना डोळे झाकून मतदान करा, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.**



प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे की, जरांगे-पाटील यांनी शरद पवार यांची जी घोषणा आहे की, २०० आमदार विधानसभेत असतील. यांच्या अंमलबजावणीला सुरुवात केली आहे. पहिल्यांदा उमेदवारी अर्ज भरा असे म्हणून सर्वांना अर्ज भरायला लावले. निजामी मराठ्यांच्या बैठका झाल्या. निजामी मराठ्यांनी काही ठिकाणी गरीब मराठा आणि काही ठिकाणी ओबीसी उमेदवार उभे करून घेतले आणि इतर ठिकाणी मराठा विरुद्ध मराठा असे चित्र उभे करण्यात आले आहे.

या बैठकांमध्ये मराठा आमदार कसे निवडून येतील याचीच रचना आखण्यात आली. या खेळात भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे एकत्र आहेत हे ओबीसींनी पहिले लक्षात घ्यावे. हे लक्षात घेतले नाही, तर आपण हुकणार हे लक्षात घ्या,

त्यांचा निर्णय झाला आहे की, मराठ्यांनी मराठ्यांनाच मतदान दिले पाहिजे. आता ओबीसींनी आरक्षण वाचवण्यासाठी मत हे एससी, एसटी, ओबीसी आणि वंचित बहुजन आघाडीच्या मुस्लीम उमेदवारांनाच दिले पाहिजेत अशी भूमिका घेतली पाहिजे. ही भूमिका जर बजावली तरच ओबीसींचे उमेदवार निवडून येतील, असेही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

### ओबीसींनी आरक्षण वाचवण्यासाठी वंचितच्या उमेदवारांना निवडून आणा

एक प्रचार निश्चित केला जाणार आहे आणि तो म्हणजे धर्म संकटात आहे. मी तमाम ओबीसींना विचारतो की, आपण आपल्या वाडवडिलांच्या, पूर्वजांचा धर्म सोडणार आहात का? तो आपण मुघलांच्या काळात सोडला नाही, तर आताच्या काळात कसा सोडणार? ही चर्चा निरर्थक आहे. ही चर्चा भाजप, आरएसएस, बजरंग दल, हिंदू महासभा यांच्यामार्फत केली जाते. पण तुम्ही त्यांना विचारा की, तुम्ही आमच्या आरक्षणाच्या बाजूने का नाही. ओबीसी आरक्षणाचे समर्थन आपण का करत नाही. धोका धर्माला नसून, आरक्षणाला आहे, असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं.

# प्रताप सरनाईक यांना विविध संस्था-समाज संघटनांचा पाठिंबा जाहीर




भाईंदर : ओवळा माजिवडा विधासभा मतदारसंघाचे आमदार – शिवसेना , भाजप , राष्ट्रवादी काँग्रेस , आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रताप सरनाईक यांना मतदारसंघातील विविध संस्था , समाज घटक , सामाजिक संस्था यांचा पाठींबा दरदिवशी वाढत आहे. गेल्या १५ वर्षात झालेली प्रचंड विकासकामे आणि पुढील ५ वर्षाचे संकल्प पत्र पाहता आमदार सरनाईक यांचा विजय निश्चित असून त्यांना ठाणे – मीरा भाईंदर मधील यादव समाज तसेच , अल्पसंख्याक संघटनांनी सुद्धा पाठिंबा दिला आहे. यावेळी प्रताप सरनाईक यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणायचे आहे , असा निर्धार यावेळी करण्यात आला. 'सबका साथ – सबका विकास – सबका विश्वास' हे सूत्र घेऊनच आमदार सरनाईक यांनी आजवर विकासाची कामे सर्वांना सोबत घेऊन केली असल्याने त्यांना व्यापक जन समर्थन मिळत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

यादव समाज या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात राहतो. विशेष म्हणजे 'फेक नॅरेटिव्ह'मुळे यातील काही लोक लोकसभा निवडणुकीत हे महाविकास आघाडीसोबत गेले होते. पण आता त्यांनी शिवसेना – भाजप महायुतीला पाठिंबा द्यायचा निर्णय घेतला आहे. आमदार प्रताप सरनाईक यांची विकासकामे दिसत आहेत आणि त्यांची प्रभावी कार्यशैली , मतदारसंघातील जनतेशी त्यांचा असलेला थेट संपर्क यामुळे आम्ही त्यांना समर्थन देत आहोत व त्यांच्या सक्रिय प्रचारात उतरायचे ठरवले आहे , आमचे प्रत्येक मत हे आमदार प्रताप सरनाईक यांना मिळणार आहे , असे यादव समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

प्राचीन काळात माणसाच्या जीवनात गायीचं अद्वितीय महत्त्व होतं. वैदिक काळात गायींना धार्मिक, वैज्ञानिक आणि आर्थिक महत्त्व प्राप्त झालं. त्यामुळे गायीला कामधेनूही म्हटलं गेलं. राज्यातील विविध भागात गायीच्या विविध प्रजाती आढळतात. गायींना 'राज्यमाता–गोमाता' घोषित करण्याचा निर्णय राज्य सरकारकडून काही दिवसांपूर्वी घेण्यात आला व तसा शासन निर्णयही लगेच प्रसिद्ध करण्यात आला होता. भारतीय परंपरेत गायीला प्रचंड महत्त्व आहे. त्याचा हवाला देऊनच सरकारने हा निर्णय घेतल्याने यादव समाज हा खुश आहे. या निर्णयाने यादव समाज आणखी प्रभावित झाला. राज्य सरकार व आमदार सरनाईक यांच्या विकासकामांचा धडाका यामुळे आम्ही यादव समाज आमदार सरनाईक यांना एक गठ्ठा मतदान करणार , असेही पदाधिकारी म्हणाले.

# कमळ केंद्रित प्रचारावर भर, बेलापूर मतदारसंघात भाजपची खेळी

नवी मुंबई : भारतीय जनता पक्षासाठी एरव्ही सुरक्षित वाटणारा बेलापूर विधानसभा मतदारसंघ संदीप नाईक यांच्या बंडखोरीमुळे आव्हानात्मक ठरू लागल्याचे लक्षात येताच भाजपच्या रणनीतीकारांनी या मतदारसंघात गोवा राज्यातून आलेली आमदारांची अधिकची कुमक तैनात केली असून उमेदवारापेक्षा चिन्हावर भर देत प्रचार आखणीतही मोठे बदल करण्यास सुरुवात केली आहे.

२०१४ पासून हा मतदारसंघ भाजपला पोषक मानला जातो. असे असले तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाची पुरेशा प्रमाणात मिळत नसलेली साथ, विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांच्या स्वभावाविषयी उभे रहात असलेले 'कथानक' आणि प्रत्यक्ष प्रचारात कमकुवत ठरत असलेला यंत्रणेचा मुद्दा भाजपच्या गोटात चिंतेचा ठरू लागला आहे. त्यामुळे अखेरच्या टप्प्यात 'कमळ' केंद्रित प्रचारावर भर दिला जाऊ लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून भाजपच्या प्रचारात चिन्ह कसे केंद्रस्थानी ठरेल याची पुरेपूर दक्षता घेतली जात आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ठाणे मतदारसंघातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे नरेश म्हस्के हे महायुतीचे उमेदवार होते. म्हस्के यांना बेलापूर मतदारसंघातून १२ हजारांचे मताधिक्य मिळाले होते. २०१४ आणि २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत या मतदारसंघातून भाजप–शिवसेनेच्या उमेदवाराला मिळालेले मताधिक्य यापेक्षा जास्त होते. पाच वर्षांपूर्वी म्हात्रे याच मतदारसंघातून ४३ हजारांपेक्षा अधिक मतांनी निवडून आल्या होत्या. असे असताना लोकसभा निवडणुकीत घटलेले मताधिक्य आणि संदीप नाईक यांची उमेदवारी यामुळे भाजपच्या रणनितीकारांना या मतदारसंघात अधिक मेहनत घेण्याची आवश्यकता वाटू लागली आहे.

### पूर्ण लक्ष केंद्रित करण्याचे आदेश

राज्यातील वेगवेगळ्या मतदारसंघात फिरणारे एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांनी अजून तरी नवी मुंबईत प्रत्यक्ष दौरा केलेला नाही. असे असले तरी शिंदे सेनेतील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते म्हात्रे यांच्या कार्यपद्धतीवर फारसे खूश नाहीत. स्थानिक पातळीवरील प्रचारातही सुसूत्रता आणण्याची धडपड सध्या पक्षाकडून सुरू असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पूर्ण फळी या भागात 'कमळ' घेऊन उतरविण्यात आल्याचे एका वरिष्ठ नेत्याने सांगितले. सुरुवातीला वाटत होता तितका हा मतदारसंघ सोपा राहिला नसल्याची जाणीव आम्हाला झाली असून त्यामुळे याठिकाणी पूर्ण लक्ष केंद्रीत करण्याचे वरिष्ठांचे आदेश आले आहेत, असेही या नेत्याने लोकसत्ताला सांगितले.

## गार्डन रीच बिल्डर इंजिनिअर लि.

■ पदाचे नाव तपशील:
१ ट्रेड अप्रेंटिस (Ex-ITI)
२ ट्रेड अप्रेंटिस (फ्रेशर)
३ पदवीधर अप्रेंटिस
४ टेक्निशियन अप्रेंटिस
५ HR ट्रेनी

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: ऑल इंडिया ट्रेड टेस्ट (AITT)
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
पद क्र.३: संबंधित विषयात BE/B.Tech
पद क्र.४: संबंधित विषयात इंजिनिअरिंग/ टेक्नोलॉजी डिप्लोमा.
पद क्र.५: ६०% गुणांसह MB-/PG पदवी / PG डिप्लोमा किंवा समतुल्य SC/ ST/ OBC/PH:५५% गुण

■ वयाची अट: ०१ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १४ ते २५ वर्षे.
पद क्र.२: १४ ते २० वर्षे.
पद क्र.३: १४ ते २६ वर्षे.
पद क्र.४: १४ ते २६ वर्षे.
पद क्र.५: २६ वर्षांपर्यंत.

■ नोकरी ठिकाण: कोलकाता रांची
■ Fee : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ नोव्हेंबर २०२४
■ संकेतस्थळ https://grse.in/

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर

Rajarshee Chhatrapati Shahu Maharaj Govt. Medical College & Chhatrapati Pramila Ra
Hospital, Kolhapur

■ पदाचे नाव तपशील:
१ प्रयोगशाळा परिचर (महाविद्यालय)
२ शिपाई (महाविद्यालय)
३ मदतनीस (महाविद्यालय)
४ क्ष-किरण परिचर (रुग्णालय)
५ शिपाई (रुग्णालय)
६ प्रयोगशाळा परिचर (रुग्णालय)
७ रक्तपेढी परिचर (रुग्णालय)
८ अपघात सेवक (रुग्णालय)
९ बाह्य रुग्णसेवक (रुग्णालय)
१० कक्ष सेवक (रुग्णालय)

■ पात्रता: १० वी उत्तीर्ण
■ वयाची अट: ३० सप्टेंबर २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/खेळाडू/ अनाथ/आ.दु. घ: ०५ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोल्हापूर
■ Fee: खुला प्रवर्ग: १०००/– मागासवर्गीय/आ. दु.घ: ९००/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० नोव्हेंबर २०२४
■ संकेतस्थळ https://rcsmgmc.ac.in

## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ पदाचे नाव तपशील:
१ कनिष्ठ आरेखक (गट–क)
२ अनुरेखक (गट–क)

■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: (i) १२वी उत्तीर्ण (ii) आरेखक (स्थापत्य) कोर्स किंवा समतुल्य (iii)Auto-CAD किंवा Geographical Information System in Spatial Planning
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) आरेखक (स्थापत्य) कोर्स किंवा समतुल्य (iii) Auto-CAD किंवा Geographical Information System in Spatial Planning

■ वयाची अट: १७ नोव्हेंबर २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ Fee: खुला प्रवर्ग: १०००/– मागासवर्गीय: ९००/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ नोव्हेंबर २०२४
■ अधिकृत संकेतस्थळ https://dtp.maharashtra.gov.in/

## राष्ट्रीय तांत्रिक संशोधन संस्था

■ पदाचे नाव तपशील:
१ सायंटिस्ट 'इ'

■ शैक्षणिक पात्रता: (i) प्रथम श्रेणी M.Sc (Electronics / Electronics Computer Science/ Applied Electronics/ Radio Physics Electronics/Geo-lnformatics/ Remote Sensing Geo-lnformatics/Mathematics/ Applied Mathematics/ Mathematics Computing/ Mathematical Sciences) किंवा प्रथम श्रेणी B.E./B.Tech (Electronics/ Electronics Communication lnstrumentation/Electronics Communication/ Electronics Power/ Telecommunication/ Electronics Telecommunication/ lnformation Communication/ Communication Optics Optoelectronics/Electrical) (ii) GATE २०२२/२०२३/२०२४

■ वयाची अट: ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी ३० वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: २५०/– SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०८ नोव्हेंबर २०२४
■ अधिकृत संकेतस्थळ https://ntro.gov.in/welcome.do

## यंत्र इंडिया लिमिटेड

■ पदाचे नाव तपशील: ITI अप्रेंटिस
२ नॉन ITI अप्रेंटिस

■ शैक्षणिक पात्रता:
ITI अप्रेंटिस: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) ५०% गुणांसह संबंधित ट्रेड मध्ये ITI (Machinist/Fitter/Electrician / Electroplater/Welder (Gas Electric) / MMTM/ Foundryman/ Mechanic Auto Electrical and Electronics/ Material Handling Equipment Mechanic cum Operator/ Tool Die Maker/ Instrument Mechanic/ Mechanic Diesel/Mechanic Motor Vehicle/ Mechanic communication Equipment Maintenance/ Electronics Mechanic/ Ex-ITI Painter /COPA/ CNC Programmer cum Operator/ Secretarial Assistant/ TIG/MIG Welder/ Mechanic Refrigeration and Air Conditioning/ Carpenter/ Attendant Operator Chemical Plant)

■ नॉन ITI अप्रेंटिस: ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण.
■ वयाची अट: २१ नोव्हेंबर २०२४ रोजी १४ ते १८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: २००/– SC/ST/महिला/PWD/Others (Transgender) : फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ नोव्हेंबर २०२४
■ संकेतस्थळ https://www.recruit-gov.com/Yantra2024/

मतदानपूर्व आणि मतदान दिवशीच्या जाहिरातींना

# 'एमसीएमसी'चे प्रमाणिकरण बंधनकारक : जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे

ठाणे : कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या दि.२० नोव्हेंबर २०२४ मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच दि.१९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/ जिल्हास्तरावरील माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती (एमसीएमसी) यांच्याकडून पूर्व-प्रमाणित केली जात नाही तोपर्यंत वृत्तपत्रात प्रकाशित करु नये. भारत निवडणूक आयोगाच्या या निर्देशाचे काटेकोरपणे पालन व्हावे, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत.

भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवसापूर्वी प्रिंट माध्यमांमधून कोणत्याही भडकाऊ, दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये. ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला खीळ बसेल, अशा जाहिराती प्रकाशित होवू नयेत, याबाबत दक्षता घेण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्यामुळे कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या दि.२० नोव्हेंबर २०२४ मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच दि.१९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात,जोपर्यंत राज्य/ जिल्हास्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व–प्रमाणित केली जात नाही, तसेच राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांना या कालावधीत प्रिंट माध्यमांमध्ये राजकीय जाहिरात द्यावयाची झाल्यास, अर्जदारांनी जाहिरात प्रकाशित करण्याच्या प्रस्तावित तारखेच्या दोन दिवस आधी माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीकडे जिल्हा माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, स्टेट बँक ऑफ इंडियाच्यावर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे अर्ज करावा, अशा सूचनाही निवडणूक आयोगाने दिल्या आहेत.

समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध करणाऱ्या

# फेसबुक व इन्स्टाग्राम अकाऊंटधारकावर गुन्हा दाखल

**ठाणे : समाजात जातीय तेढ निर्माण होईल, अशा प्रकारचा मजकूर समाजमाध्यमांवर पोस्ट करणाऱ्या आमची मुंबई या फेसबुक व इन्स्टाग्राम अकाऊंटधारकांविरोधात आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातील आचारसंहिता पथकाने नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.**

१४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघाचे आचारसंहिता पथक प्रमुख नरेंद्र चव्हाण यांनी याबाबत नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. 'आमची मुंबई'या नावाच्या फेसबुक व इन्स्टाग्राम या अकाऊंटवरुन 'मराठी मुंबई की मुस्लिम मुंबई', 'मिरा–भाईंदर काँग्रेसला मत म्हणजे मुस्लिम लागुलचालनाला मत', 'काँग्रेसला मत म्हणजे लव जिहादला मत, 'मविआ सत्तेत आलीत तर मुस्लिम मुख्यमंत्र्यांसाठी मत'अशा आशयाचे मजकूर तयार करुन राहुल गांधी व मुझफ्फर हुसेन यांच्याविरुद्ध बदनामीकारक छायाचित्र व दोन समाजात जातीय तेढ निर्माण होईल, अशा प्रकारचे मजूकर असलेली पोस्ट प्रसिद्ध केल्याची तक्रार नरेंद्र चव्हाण यांच्याकडे सॅम्युअल करात, भरत विलनकर, अनिल पवार, संकेत मोहिते, भरत छेडा, रफिक पठाण, यशपाल सुरेका, शैलेश माथुरे, कुणाल काटकर, राहुल राय यांनी दि. २ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या अर्जान्वये केली होती. या तक्रारीची दखल घेवून आमची मुंबई नावाच्या फेसबुक व इन्स्टाग्राम अकाऊंटवरील पोस्टची शहानिशा केली असता आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध केला असल्याचे सिद्ध झाले. याची दखल घेवून आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी आमची मुंबई या फेसबुक व इन्स्टाग्राम अकाऊंटधारकाविरोधात भारतीय न्याय संहिता कायद्याचे कलम १९६ व लोकप्रतिनिधीत्व अधिनियमचे कलम १२५ अन्वये नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरी समाजात जातीय तेढ निर्माण होईल, एखाद्याचे चारित्र्यहनन होईल, जात–धर्म–पंथ, याविषयी आक्षेपार्ह मजकूर कोणत्याही माध्यमांद्वारे प्रदर्शित/प्रसारित करू नये, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासन व एकत्रित माध्यम कक्षाने केले आहे.

# ठाण्यातील खोपट बसस्थानकावरील प्रवाशांमध्ये मतदानाबाबत जनजागृती

ठाणे : लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी आपली सर्व कामे बाजूला ठेवून उज्ज्वल भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी आणि सर्वांनी न चुकता दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी अवश्य मतदान करावे, असे आवाहन खोपट परिसरातील बसस्थानकावर करण्यात आले. १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघात निवडणूकविषयक मतदार जनजागृती व्हावी व मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खोपट परिसरातील बसस्थानकावर मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

या जनजागृती मोहिमेत बसस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या ठिकाणी १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघाचे मतदान जनजागृतीबाबत लावण्यात आलेले मोठे फलक हे प्रवाशांचे लक्ष वेधून घेत होते. यावेळी स्वीपच्या पथकाने बसस्थानकावरील प्रवाशांना मतदानाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमात ठाणे परिवहन बसस्थानक येथील सर्व अधिकारी, कर्मचारी व प्रवासी सहभागी झाले होते. यावेळी 'मतदान जनजागृती'विषयक माझं मत माझा अधिकार, मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो आणि जागरूक मतदार लोकशाहीचा आधार या घोषणा सर्व प्रवाशांनी मोठ्या आवाजात सामूहिकपणे दिल्या.

# नवी मुंबई बिल्डर्स आणि आर्किटेक्ट असोसिएशन सोबतच्या बैठकीत मतदार टक्केवारी वाढविण्याचे आवाहन

नवी मुंबई : महाराष्ट्र विधानसभेच्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावावा तसेच बिल्डर असोसिएशन आणि आर्किटेक्ट असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी व त्यांच्या कार्यालयात काम करणारे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय यांनीही मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने दोन्ही असोसिएशनच्या मतदार जनजागृतीविषयक आयोजित विशेष बैठकीत करण्यात आले.

ग्रामीण भागाच्या तुलनेत नागरी भागात मतदानाची कमी असलेली टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने विधानसभा निवडणुक कार्यालयांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांनाही कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध माध्यमांचा वापर करुन थेट जनतेपर्यंत पोहोचून मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून महापालिका आयुक्त विविध संस्था, संघटना, मंडळे यांच्यासोबत थेट संवाद साधत असून महापालिका स्तरावरुन विविध संस्था, संघटनांच्या मतदार जनजागृती बैठका घेण्यात येत आहेत. अशाच प्रकारची जनजागृतीपर बैठक नवी मुंबई बिल्डर असोसिएशन व नवी मुंबई आर्किटेक्ट असोसिएशन यांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी नवी मुंबईतील दोन्ही विधानसभा मतदार संघाकरिता जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नियुक्त स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता श्री.शिरीष आरदवाड, सहा.संचालक नगररचना श्री.सोमनाथ केकाण, १५० ऐरोली विधानसभा स्वीप नोडल अधिकारी उपआयुक्त श्रीम. अभिलाषा म्हात्रे पाटील, १५१ बेलापूर विधानसभा स्वीप नोडल अधिकारी सहाय्यक आयुक्त सागर मोरे व दोन्ही असोसिएशनचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

यावेळी आयुक्तांनी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांमार्फत आपले सदस्य, कर्मचारी, कुटुंबिय व संपर्कात येणारे ग्राहक आणि नागरिक यांच्यापर्यंत मतदान करण्याचा संदेश पोहचविण्यात यावा व प्रत्येकाने मतदान करावे यासाठी प्रोत्साहित करावे असे सांगितले. बिल्डर व आर्किटेक्ट यांनी आपल्या कार्यालयातील मतदार असलेल्या कर्मचाऱ्यांना मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे वेळेत सवलत दयावी असेही आयुक्तांनी सूचित केले.

नवी मुंबई महानगरपालिका विविध प्रकारे मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असून नागरिकांना त्यांचा मतदार क्रमांक व मतदान केंद्राचे ठिकाण शोधणे सोपे जावे याकरिता त्यांच्यापर्यंत हस्तपत्रके पोहचविली जात असून प्रत्येक सोसायटीवर ही माहिती सहजपणे उपलब्ध होईल असा क्यू आर कोड देखील पोस्टर्स स्वरुपात प्रसारित केला जाणार आहे.

याशिवाय मतदार केंद्राच्या परिसरात मतदार केंद्राकडे जाण्याचे दिशादर्शक फलक तसेच मतदार केंद्राबाहेर दर्शनी जागी त्या केंद्रामधील खोल्यांमध्ये कोणत्या मतदार क्रमांकाचे मतदान आहे याच्याही खोलीनिहाय माहितीचे फलक प्रसिध्द केले जाणार आहेत. याशिवाय मतदान केंद्रावर आलेल्या नागरिकांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये अशा सर्व सुविधा मतदार केंद्रांवर उपलब्ध करुन दिल्या जात असल्याची माहिती आयुक्तांनी यावेळी दिली.

# निवडणूक विशेष पोलीस निरीक्षकांनी घेतला कोकण विभागातील निवडणूक तयारीचा आढावा

ठाणे : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीची मतदान प्रक्रिया २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर कोकण विभागातंर्गत येणाऱ्या सर्व जिल्ह्यांच्या तयारीचा आढावा आज निवडणूक विशेष पोलीस निरीक्षक दीपक मिश्रा यांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीदरम्यान घेतला. निवडणूकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून या कर्तव्यात कोणतीही कसूर राहणार नाही. या दृष्टीने विधानसभा सार्वत्रिक निवडणूका शांततेत व सुरळीत पार पडण्यासाठी ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सर्व जिल्ह्यातील जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस प्रशासन यांनी सतर्क राहण्याचे आदेश देत आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना बैठकीत दिल्या.

आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक विशेष पोलीस निरीक्षक यांनी कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांतील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग येथील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी हे दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

सुरूवातीला ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी ठाणे जिल्हयातील १८ विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रे, मतदानाची तयारी याबाबत सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली. तसेच कोकण विभागातंर्गत इतर जिल्ह्याबाबतही त्यांनी जाणून घेतले.

प्रत्येक जिल्हयात तयार करण्यात आलेल्या कंट्रोल रुमच्या माध्यमातून मतदानाच्या एक दिवस आधी १९ नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रियेची अभिरुप चाचणी घेण्यात यावी, जेणेकरुन मतदानाच्या दिवशी येणाऱ्या संभाव्य अडचणी टाळता येतील. मतदान केंद्रावर मतदानासाठी येणारे उमेदवार हे मतदान झाल्यानंतर मतदान केंद्राच्या बाहेर १०० मीटर परिसरात रेंगाळणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी, असे श्री. मिश्रा यांनी नमूद केले. मतदान केंद्रावर येणाऱ्या वयोवृद्ध मतदारांसाठी जास्तीत जास्त व्हीलचेअर उपलब्ध करण्यात याव्यात, जेणेकरुन मतदारांना मतदान केंद्रावर ताटकळत उभे रहावे लागणार नाही, यासाठी आपल्या विभागातील रुग्णालय, सेवाभावी संस्थांशी संपर्क साधून व्हीलचेअरची पुरेशी उपलब्धतता प्रत्येक मतदान केंद्रावर करण्यात यावी, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

एखाद्या मतदान केंद्रावर मशीनमध्ये काही तांत्रिक अडचण निर्माण होवून मतदान प्रक्रिया थांबली किंवा अन्य काही अडचण उद्भवली तर त्याचे वृत्त हे दिवसभर विविध वाहिन्यांवर दाखवले जाते. त्या ठिकाणी मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू झाल्यावरसुध्दा ती बातमी तशीच सतत सुरू असते याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती घेवून संबंधित वाहिन्यांशी संपर्क साधून वस्तूस्थिती तात्काळ कळविण्याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, जेणेकरुन निवडणूक विभागाची बदनामी होणार नाही, या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी सूचनाही श्री.दीपक मिश्रा यांनी दिली.

जिल्ह्यातील सर्व ठिकाणी भरारी पथकाच्या माध्यमातून सुरू असलेली वाहनांची तपासणी देखील काटेकोरपणे करण्याचे निर्देश निवडणूक विशेष पोलीस निरीक्षक दीपक मिश्रा यांनी पोलीस प्रशासनाला दिले. कोकण विभागातील सर्व जिल्हयांची मतदानाची तयारी ही अंतिम टप्प्यात असून एखादी समस्या उद्भवल्यास तात्काळ निवडणूक आयोगाशी समन्वय साधावा असे नमूद करीत त्यांनी निवडणूका नि:पक्षपातीपणे व निर्भयपणे पार पाडण्यासाठी सर्व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

# १३७ भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघामध्ये १० ज्येष्ठ व ०५ दिव्यांगांनी केले गृह मतदान




भिवंडी : मतदानाचा टक्का वाढावा व मतदानापासून कोणीही मतदार वंचित राहू नये यासाठी लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीसाठी ८५ वर्षावरील जेष्ठ मतदारांसाठी तसेच दिव्यांग मतदारांसाठी निवडणूक आयोगामार्फत १२ ड नमुना अर्ज भरून घरूनच मतदान करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार १३७ भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघात ज्या इच्छुक मतदारांनी विधानसभा निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडे १५ मतदारांनी फॉर्म भरून दिले होते. त्यानुसार संपुर्ण १५ मतदारांनी टपाली मतदान करून आपला मतदानाचा अधिकार बजावला यामध्ये ८५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या १० ज्येष्ठ मतदारांचा व ०५ दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. अशी माहिती १३७ भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप यांनी दिली.

# नवी मुंबईत घरोघरी मतदान जागृतीची माहितीपत्रके वितरीत करून मतदान करण्याचे आवाहन



नवी मुंबई : मतदानाविषयी आवश्यक माहिती उपलब्ध होऊन एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेने नियोजन केले असून मतदानाविषयी आवश्यक माहिती देणारे माहितीपत्रक घरोघरी वाटप करण्यात येत आहे. या माहिती पत्रकाचे अनावरण नुकतेच महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते नवी मुंबईतील दोन्ही विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, सहा.संचालक नगररचनासोमनाथ केकाण, १५० ऐरोली विधानसभा स्वीप नोडल अधिकारी उपआयुक्त श्रीम.अभिलाषा म्हात्रे पाटील, १५१ बेलापूर विधानसभा स्वीप नोडल अधिकारी सहाय्यक आयुक्तसागर मोरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या माहितीपत्रकावर तरुणाईला तसेच सर्वच मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले असून मतदान करण्याचे महत्वही सांगण्यात आले आहे. तसेच या पत्रकावर वोटर हेल्पलाईन ॲपचे क्यूआर कोड प्रसिध्द करण्यात आले असून न्ड्रॉइड व पल अशा दोन्ही प्रकारच्या मोबाईल फोनसाठी स्वतंत्र क्यूआर कोड प्रसिध्द करण्यात आले आहेत. हा क्यूआर कोड स्कॅन करुन कोणताही मतदार आपले मतदार यादीतील नाव, आपला भाग क्रमांक, मतदार क्रमांक तसेच मतदार केंद्राचे ठिकाण ही माहिती अगदी सहजगत्या उपलब्ध करुन घेऊ शकतो.

सदरची माहितीपत्रके आशा वर्कर तसेच अंगणवाडी सेविका यांच्यामार्फत घरोघरी वितरीत केली जात असून प्रत्येकाने २० नोव्हेंबर रोजीच्या विधानसभा निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले जात आहे. त्याचप्रमाणे निवडणुकीसाठी नियुक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत प्रत्येक मतदारापर्यंत त्याचा भाग क्रमांक, मतदार क्रमांक आणि त्याचे मतदान कोणत्या केंद्रावर आहे अशी संपूर्ण माहिती असलेली मतदार चिठ्ठी पोहचविली जात आहे.

या माध्यमातून विधानसभा निवडणूक कार्यालयांप्रमाणेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही मतदारांपर्यंत थेट पोहचून त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

१४२ कल्याण पूर्व मतदारसंघातील विविध

# विविध शाळांमध्ये मानवी साखळीद्वारे मतदान जनजागृती

कल्याण : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत १४२ कल्याण पूर्व विघानसभा मतदार संघात मतदार जनजागृतिसाठी विविध जनजागृतीपर स्वीप कार्यक्रमाची अंमलबजावणी ठिकठिकाणी होत आहे. याच अनुषंगाने १४२ कल्याण पूर्वचे निवडणूक निर्णय अधिकारी रमेश मिसाळ आणि सहा. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वाती घोंगडे यांचे मार्गदर्शनाखाली स्वीप पथकातील (मतदार जनजागृतीपथक ) महापालिकेचे शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी विजय सरकटे (स्वीप) यांनी दि . ११ नोव्हेंबर रोजी शाळा व महाविद्यालयीन मुख्यध्यापक आणि प्राचार्य यांना दिलेल्या निर्देशानुसार आज स्वीप नोडल अधिकारी अधिपत्याखाली १४२ कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघात सम्राट अशोक हायस्कूल,गणेश विद्या मंदिर,ट्रिनिटी इंग्लिश स्कूल,नारायणी इंग्लिश स्कूल, मातोश्री रखमाबाई गायकवाड विद्यालय, देविदयाल हिंदी हायस्कूल,नूतन हिंदी विद्यालय या शाळेतील विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करून आपल्या शाळेच्या परिसरातील चौकापर्यंत विविध घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधून मतदान जनजागृती करण्यात आली. तसेच नागरिकांना येत्या दि.२० नोव्होबर रोजी मोठ्या प्रमाणात मतदान करणेबाबत आवाहन करण्यात आले. सदर परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकांनी उपस्थिती दर्शविली.

सदर ठिकाणी मोठया प्रमाणात लाऊडस्पिकर व्दारे मतदान जनजागृतीपर गीत वाजवून मतदान करणेबाबत आवाहन करण्यात आले. तसेच मोठ्या प्रमाणात पामलेटचे वाटप करण्यात आले.

# माथाडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध : प्रशांत ठाकूर



पनवेल : कळंबोलीमध्ये झालेल्या माथाडी कामगार मेळाव्यात आमदार प्रशांत ठाकूर यांनी माथाडी कामगारांसोबत संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास कामगारांना दिला. पनवेल विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ माथाडी कामगार मेळावा आयोजित केला होता. कामगारांच्या हितासाठी पडेल तो संघर्ष करण्याची तयारी भाजपची आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सांगितले.

या मेळाव्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, शिवसेना पनवेल जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादीचे नेते शिवदास कांबळे, भाजपचे माथाडी कामगार ट्रान्सपोर्ट सेलचे उपाध्यक्ष संजय भगत, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, माजी नगरसेविका मोनिका महानवर, अमर ठाकूर, अशोक मोटे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार उपस्थित होते.

पनवेलचा विकास करणारे आमदार प्रशांत ठाकूर यांना आपले बहुमोल मत देऊन विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी प्रचारावेळी मतदारांना केले. तसेच महायुती सरकारने जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवून त्यांचा लाभ मिळवून दिला आहे. लाडकी बहीण योजना राबवून महिला सक्षमीकरणाचे काम केले तसेच आत्ता या योजनेचे पसे वाढविण्यात येणार आहेत. त्यामुळे गतीमान पद्धतीने काम करणारे महायुतीचे सरकार राज्यात पुन्हा सत्तेत आणा असेही त्यांनी यावेळी म्हंटले.

पनवेल विधानसभा मतदार संघाचा विकास करणारे कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रचारात जोरदार आघाडीत घेतली आहे. महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे संपुर्ण मतदार संघ पिंजुन काढत आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रचंड मतांनी विजयी करण्यासाठी जोरदार प्रचार करत आहेत. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांनी महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह पनवेल मतदार संघातील नेरेपाडा, नेरे, सांगटोली, मालडुंगे ग्रामपंचायतीमधील विविध वाड्या, शिवनसई, तामसई, बोंडारपाडा, दुंदरे, दुंदरेपाडा, रिटघर आणि चिंचवली मध्ये प्रचार केला. यावेळी ठिकठिकाणी त्यांचे माता भगिनींनी औक्षण करून स्वागत केले. तसेच ज्येष्ठांनीही त्यांना विजयाचा आशीर्वाद दिला.

१८ विधानसभा मतदारसंघातील १२ विधानसभा मतदारसंघातून

# गेल्या तीन दिवसात ७४६ ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांनी केले गृहमतदान

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात गृहमतदानास दि.९ नोव्हेंबर २०२४ पासून सुरुवात झाली आहे. गेल्या तीन दिवसांत १८ विधानसभा मतदारसंघातील १२ या मतदारसंघात ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग नागरिकांचे गृहमतदान पार पडले. या गृहमतदानात एकूण ७४६ नागरिकांनी गृहमतदानाच्या माध्यमातून मतदानाचा अधिकार बजावला.

दि.९ नोव्हेंबरपासून गृहमतदानास सुरूवात झाली असून दि.१७ नोव्हेंबर २०२४ पर्यंत गृहमतदान सुरू राहणार आहे. दि.९ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर या तीन दिवसात १३४ भिवंडी ग्रामीण, १३५ शहापूर अ.ज, १३८ कल्याण पश्चिम, १३९ मुरबाड, १४० अंबरनाथ, १४१ उल्हासनगर, १४२ कल्याण पूर्व, १४३ डोंबिवली, १४६ ओवळा माजिवडा, १४७ कोपरी पाचपाखाडी, १४८ ठाणे तर १४९ कळवा मुंब्रा विधानसभा मतदारसंघात गृहमतदान पार पडले. या गृहमतदानास ८५ वरील ज्येष्ठ मतदारांचा व दिव्यांग मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून जे मतदार मतदान केंद्रापर्यंत पोहोचू शकत नाही अशांसाठी मा.भारत निवडणूक आयोगाने गृहमतदानाची सोय केल्याबद्दल अनेक ज्येष्ठ नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

- *१३४ भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - ७८, दिव्यांग मतदार - ०२*
- *१३५ शहापूर अ.ज. विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - ५५, दिव्यांग मतदार - ०८*
- *१३८ कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - ४३, दिव्यांग मतदार - ०२*
- *१३९ मुरबाड विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - ५८, दिव्यांग मतदार - ०२*
- *१४० अंबरनाथ विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - ५६, दिव्यांग मतदार - २२*
- *१४१ उल्हासनगर विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - २४, दिव्यांग मतदार - ०७*
- *१४२ कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - ५९, दिव्यांग मतदार - १२*
- *१४३ डोंबिवली विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - ७८, दिव्यांग मतदार - ०२*
- *१४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - ४३, दिव्यांग मतदार - १८*
- *१४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - ३६, दिव्यांग मतदार - ०५*
- *१४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक- १११, दिव्यांग मतदार - ०४*
- *१४९ कळवा मुंब्रा विधानसभा मतदारसंघ - ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक - १०, दिव्यांग मतदार - ११*

# मतदानाचा टक्का वाढवा पुरस्कार मिळवा...

## ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशनची अभिनव स्पर्धा

ठाणे : विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाचा टक्का वाढावा याकरिता निवडणुक आयोगाकडून जनजागृतीपर वेगवेगळे उपक्रम राबवले जात असतानाच ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशनद्वारे नाविन्यपूर्ण उपक्रम आखले आहेत. ठाण्यातील गृहनिर्माण सोसायट्यांनी १०० टक्के मतदान व्हावे, या अपेक्षेने, फेडरेशनने मतटक्का वाढवा आणि पुरस्कार मिळवा अशी अभिनव स्पर्धा आयोजित केली आहे. अशी माहिती फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी दिली. या उपक्रमात ८० टक्के आणि त्यापेक्षा जास्त मतदान करणाऱ्या सोसायट्यांना ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याहस्ते गौरविण्यात येणार आहे. लोकशाहीचा मोठा उत्सव असलेल्या महाराष्ट्रातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. तेव्हा, या विधानसभा निवडणूकीत ठाणे जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशनने कंबर कसली आहे. त्यानुसार, निवडणुकीत किमान ८० टक्के मतदान करणाऱ्या ठाणे जिल्हयातील गृहनिर्माण सोसायटयांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. ज्या गृहनिर्माण सोसायटीत ८० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान होईल, त्या सोसायटयांनी निर्धारीत मतदान केल्याच्या विहित पुराव्यासह ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशनच्या शिवाजी पथ येथील कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन सीताराम राणे यांनी केले आहे.

# ठाणे जिल्ह्यात २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

ठाणे : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यात व ठाणे जिल्ह्यात भारत निवडणूक आयोगामार्फत आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या आचारसंहिता काळात नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात प्रशासनामार्फत कठोर कारवाई करण्यात येते. या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमधून दि.११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत एकूण २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल प्रशासनाकडून जप्त करण्यात आला आहे.

यामध्ये १२ कोटी ४१ लाख १६ हजार रोख रक्कम, २ कोटी २२ लाख १४ हजार रुपये किंमतीचा मद्यसाठा, १ कोटी ६४ लाख ७० हजार रुपये किंमतीचे अंमली पदार्थ, २३ लाख २६ हजार रुपये किंमतीच्या मौल्यवान वस्तू / दागिने आणि ६ कोटी ८९ लाख ७९ हजार रुपये किंमतीचे मोफत वाटपाचे साहित्य ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमधून प्रशासनाकडून जप्त करण्यात आले आहे.

# मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य

**ठाणे : विधानसभा निवडणूकीसाठी दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार असून मतदान करण्यासाठी, ज्या मतदारांचे मतदारयादीत नाव आहे, अशा मतदारांकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदान करता येणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.**

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्रा व्यतिरिक्त १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्त्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान पाच दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती - चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# आचार संहितेच्या काळात २३ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

लाखो लिटर दारू; ६ कोटींचे मोफत वाटप साहित्य; १ कोटींचे अंमली पदार्थ

ठाणे : जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघामध्ये आचार संहितेच्या काळात मागील सुमारे एक महिन्याच्या कालावधीत २३ कोटी ४१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये १२ कोटी रुपयांची रोख रक्कम पकडण्यात आली असून यातील सर्वाधिक ४ कोटी रक्कम शहापूर विधानसभा मतदारसंघातून जप्त करण्यात आली आहे. तर भिवंडी ग्रामीण मतदारसंघातून तब्बल १ लाख लिटर दारू जप्त करण्यात आली आहे. तर ओवळा माजिवडा मतदारसंघातून १ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. तर ठाणे शहर विधानसभेतून ३ कोटी ३३ लाख रुपयांचे मतदारांना वाटण्यासाठीचे मोफत साहित्य जप्त करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक विभागांच्या पथकांकडून ठिकठिकाणी वाहनांची तपासणी करण्यात येत असते. यामध्ये अवैध पद्धतीने रोख रक्कम, मद्य, अंमली पदार्थ आणि मतदारांना वाटण्यासाठी नेण्यात येणाऱ्या वस्तू यांसारखा मुद्देमाल निवडणूक विभागाच्या पथकाकडून कारवाई करून जप्त करण्यात येत असतो. याच पद्धतीने जिल्ह्यात आचार संहिता लागू झाल्यापासून जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक विभागाच्या भरारी पथकाकडून कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये एकूण २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल प्रशासनाकडून जप्त करण्यात आला आहे. यामध्ये १२ कोटी ४१ लाख १६ हजार रोख रक्कम, २ कोटी २२ लाख १४ हजार रुपये किंमतीचा मद्यसाठा, १ कोटी ६४ लाख ७० हजार रुपये किंमतीचे अंमली पदार्थ, २३ लाख २६ हजार रुपये किंमतीच्या मौल्यवान वस्तू, दागिने आणि ६ कोटी ८९ लाख ७९ हजार रुपये किंमतीचे मोफत वाटपाचे साहित्य ठाणे जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमधून प्रशासनाकडून जप्त करण्यात आले आहे.

**सर्वाधिक घबाड कुठे? ( विधानसभा निहाय सर्वाधिक रक्कम )**

शहापूर - ४ कोटी
बेलापूर - ३ कोटी २४ लाख
भिवंडी पूर्व - २ कोटी ३० लाख
मीरा भाईंदर - १ कोटी ४९ लाख

**सर्वाधिक मद्य (रुपये)**

भिवंडी ग्रामीण - ४८ लाख
कल्याण पूर्व - ३५ लाख
शहापूर - २२.७४ लाख

सर्वाधिक अंमली पदार्थ (रुपये)
ओवळा माजिवडा - १ कोटी २६ लाख
ऐरोली - १४ लाख

**सर्वाधिक मोफत वाटपाचे साहित्य (रुपये)**

ठाणे - ३ कोटी ३३ लाख
भिवंडी ग्रामीण - ८८ लाख
बेलापूर - ५१ लाख
भिवंडी पश्चिम - ४७ लाख

# जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील चार मतदारसंघात पार पडली

## मतदानाकरिता मतदान यंत्रे तयार करण्याची प्रक्रिया

ठाणे : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून मतदानाकरिता लागणारी मतदान यंत्रे मतदानाकरिता तयार करण्याची प्रक्रिया ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात आजपासून टप्प्याटप्प्याने सुरू झाली. प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी समक्ष होत असून ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शीपणे होत आहे. सोमवार, दि.११ नोव्हेंबर रोजी १३६ भिवंडी (पश्चिम), १४४ कल्याण ग्रामीण, १४६ ओवळा माजिवडा व १४९ कळवा मुंब्रा विधानसभा मतदारसंघात मतदानाकरिता लागणारी मतदान यंत्रे तयार करण्याची प्रक्रिया पार पडली.

१३६ भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदार संघ मध्यवर्ती निवडणूक कार्यालयात मतदान यंत्रे तयार करण्याची प्रक्रिया पार पडली. १३६ भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदार संघात एकुण ३०३ मतदान केंद्र असून प्रत्येक मतदान केंद्रनिहाय १ मशिन आणि मतदान केंद्राच्या २०% राखीव या प्रमाणात अतिरिक्त मशीन असे एकूण बॅलट युनिट BU-३६३, कंट्रोल युनिट CU-३६३ व VVPAT-३९३ मतदान यंत्रांची सिलिंगची कार्यवाही सुरु करण्यात आली. याकामी १३५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, एकूण ३६३ मतदान यंत्रांच्या ५% या प्रमाणात एकूण १८ मतदान यंत्रे मॉकपोलसाठी सुनिश्चित करण्यात आली. ही यंत्रे निश्चित करताना निवडणूक निर्णय अधिकारी उदय किसवे यांनी चिठ्या टाकल्या, तर उमेदवार/उमेदवारांचे प्रतिनीधी यांनी चिठ्या उचलून ही १८ मतदान यंत्रे निश्चित केली. सिलींग व मॉकपोल नंतर ही यंत्रे स्ट्रॉगरुम येथे सुरक्षीतरित्या ठेवण्यात आली आहे.

१४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाची प्रक्रिया सावित्रीबाई फुले कलामंदिर, तळ मजला, डोंबिवली (पूर्व) येथे आज पार पडली. १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघात ४३३ + १अशी एकूण ४३४ मतदान केंद्रे आहेत. प्रथम निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर चिठ्ठ्या टाकून एकूण मतदान केंद्रांच्या ५ % म्हणजेच एकूण २२ EVM ची निवड करण्यात आली. या EVM मध्ये प्रत्येकी १ हजार मतांसाठी अभिरुप मतदानाची (मॉक पोल) प्रक्रिया सुरु करण्यात आली. १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ४३४ मतदान केंद्रांमध्ये संपन्न होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी ५२० कंट्रोल युनिट व ५२० बॅलट युनिट आणि ५६४ VVPAT यंत्रे मतदानासाठी तयार करण्याची प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रध्दा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

१४६-ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाची प्रक्रिया न्यू होरायझॉन स्कूल आनंदनगर येथे पार पडली. १४६-ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघात ४८७ + ११ (Auxiliary) अशी एकूण ४९८ मतदान केंद्रे आहेत. आज प्रथम निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर चिठ्ठ्या टाकून एकूण मतदान केंद्रांच्या ५% म्हणजेच एकूण २५ EVM ची निवड करण्यात आली. या EVM मध्ये प्रत्येकी १ हजार मतांसाठी अभिरुप मतदानाची (मॉक पोल) प्रक्रिया सुरु करण्यात आली. १४६-ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघातील ४८७ + ११ = ४९८ मतदान केंद्रांमध्ये संपन्न होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी ५४८ कंट्रोल युनिट व ५४८ बॅलट युनिट आणि ६४७ व्हीव्हीपॅट यंत्रे मतदानासाठी तयार करण्याची प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी इब्राहिम चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.






### संजय केळकर यांचा मॉर्निंग वॉकवर भर...


## लोढा अमारा येथील नागरिकांशी साधला सवांद



ठाणे : जय श्री राम... संजय केळकर आगे बढो आशा घोषणा देत सकाळी मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या जेष्ठ नागरिकांसह बाल तरुणांनी ठाणे शहर विधानसभेचे भाजपचे आमदार संजय केळकर यांना पाठिंबा दिला.

ठाणे शहर विधानसभेचे भाजपचे आमदार संजय केळकर यांनी मॉर्निंग वॉकच्या प्रचारावर अधिक भर दिल्याचे दिसून येत आहे. मागील आठवड्यापासून त्यांनी शहरातील विविध भागात मॉर्निंग वॉक करण्यावर भर देण्यास सुरुवात केली आहे. त्याला ठाणेकर नागरिकांचा सुद्धा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मंगळवारी सकाळी ७ वाजता त्यांनी आपल्या पदाधिकारी यांच्या सह लोढा आमरा येथील मॉर्निंग वॉक करण्याऱ्या नागरिकांची भेट घेतली. त्यांच्या बरोबर चालता चालता त्यांनी चर्चा देखील केली. यावेळी नागरिकांनी देखील त्यांना आपला पाठिंबा तुम्हालाच असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. तसेच यावेळी जय श्री राम चा गजर सर्वदूर पसरला होता. संजय केळकर आगे बढो हम तुम्हारे साथचा गजर दिला गेला.

# अटल सागरी सेतू वेगवान प्रगतीचे उद्दिष्ट साध्य करणारा प्रकल्प : मुख्यमंत्री शिंदे



मुंबई : देशातील सर्वात जास्त २२ किलोमीटर लांबीचा समुद्री मार्गावरील 'अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू' (मुंबई पारबंदर प्रकल्प) या प्रकल्पामुळे वेगवान प्रगतीचे उद्दिष्ठ साध्य होत आहे. मुंबई ते नवी मुंबई हे दोन तासांचे अंतर अवघ्या २० मिनिटांत पार होत असल्याने या वेगवान वाहतुकीमुळे मुंबईकरांनाही मोठा दिलासा मिळत आहे.

सध्या या पुलाला पर्यायी असलेल्या रस्त्यावरून प्रवास करण्यासाठी दीड ते दोन तासाचा वेळ लागतो. पण यामुळे आता शिवडीतील व्यक्तीला २० मिनिटांत नवी मुंबईत पोहोचता येत आहे. त्याशिवाय हा मार्ग पुणे-मुंबई एक्सप्रेस-वे आणि मुंबई-गोवा मार्गाला जोडणारा आहे. त्याचबरोबर या प्रकल्पामुळे वेळेची तर बचत होतेच, त्याचबरोबर इंधनमध्ये सुद्धा बचत होत असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.

अटल सेतू नवी मुंबई, रायगड यासह इतर शहरांना जोडत असून त्यामुळे या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासाचे प्रकल्प, मोठे उद्योग समूह येणार आहेत. त्यातून या परिसराचाही विकास होणार आहे. हा मार्ग शिवडी येथून सुरु होवून समुद्रमार्गे चिर्ले येथील न्हावा शेवा येथ इतर मार्गांना जोडला जातो. मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या संपणार असून मुंबई ते नवीमुंबईत अवघ्या २० मिनिटात जाता येणार आहे. प्रकल्पाचे काम पर्यावरणाचा समतोल राखून पूर्ण केले असून समतोलामुळे शिवडी समुद्र परिसरात फ्लेमिंगो पक्षी वाढले आहेत. हा सेतू मार्ग मुंबई- गोवा महामार्ग, वसई-विरार, नवी मुंबई, रायगड जिल्ह्याला जोडला जात असल्याने विविध मोठे उद्योग, विकासात्मक प्रकल्प नवी मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणावर येणार असल्याने परिसराचाही विकास होणार आहे. युवकांच्या रोजगारासाठी ५०० स्किल कौशल्य विकास केंद्रे सुरू केली असून जनतेच्या हितासाठी महत्वाचे निर्णय सरकारने घेतले आहेत, आणखी विकासात्मक निर्णय घेत आहे.

### अटल सेतूविषयी थोडक्यात

- मुंबई ट्रान्स हार्बर सागरी मार्ग (एमटीएचएल) हा अति जलद, अति महत्त्वाचा आणि स्थापत्य अभियांत्रिकीचा देशातील आदर्श नमुना
- ५०० बोइंग विमाने व १७ आयफेल टॉवर एवढ्या वजनाच्या लोखंडाचा वापर.
- शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू एकूण २२ किमी लांबीचा असून त्यातील १६.५० किमी भाग समुद्रामध्ये तर उर्वरित ५.५० किमी भाग जमिनीवर.
- भारतातील सर्वात मोठा सागरी सेतू तर जगातील १२ व्या क्रमांकाचा सागरी सेतू. सागरी सेतूसाठी १८ हजार कोटी रुपयांचा खर्च.
- सागरी सेतू मुंबई बंदर व जवाहरलाल नेहरू पोर्ट या दोन प्रसिद्ध बंदरांना जोडणारा.
- मुंबई, नवी मुंबई, रायगड, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग तसेच मुंबई-गोवा महामार्ग यातील अंतर सुमारे १५ किमीने कमी झाले.
- महासेतू पूर्ण होण्यासाठी सुमारे सात वर्षांचा कालावधी लागला.

## महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या बाईक रॅलीला उदंड प्रतिसाद





पनवेल : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि मित्रपक्ष माहायुतीचे पनवेल मतदार संघाचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ पनवेल आणि खांदा कॉलनी शहरामध्ये भव्य बाईक पार पडली. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी आणि त्या प्रामुख्याने तरुणांनी मोठ्या जोशात एकत्र येत बाईकवर बाईक रॅलीने जोरदार प्रचार केला. यावेळी महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

पनवेल विधानसभा क्षेत्राला विकासाच्या दिशेने नेणारे कार्यकुशल आमदार प्रशांत ठाकूर यांचा जोरदार सुरु आहे. त्यानुसार पनवेल शहरात भव्य बाईक रॅलीचे आयोजन सोमवारी सायंकाळी करण्यात आले होते. शहरातील सोसायटी ग्राऊंड पासून या रॅलीला सुरु झाली असून पुढे गांधी हॉस्पिटल छत्रपती शिवाजी महाराज चौक - पंचरत्न चौक-एमजी रोड-पोटे मसाला-मुसलमान नाका-विट सेंटर साईनगर दि. बा. पाटील साहेब संग्राम बंगला-सहस्त्रबुद्धे हॉस्पीटल पायोनियर मॉर्डन स्वीट-खांदा कॉलनी भाजपा कार्यालय-साई बाबा मंदीर-किबा हॉटेल-अष्टविनायक हॉस्पीटल श्रीकृपा हॉल सेक्टर ६ दुर्गामाता मंदीर-मेन मार्केट-तिर्थराज सोसायटी-खांदा कॉलनी पूल, सेक्टर १० सीकेटी कॉलेज असे मार्गक्रमण करत भाजपा कार्यालयाजवळ या रॅलीची सांगता झाली.

यावेळी कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, विश्वजीत बारणे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, विधानसभा प्रमुख व जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या बाईक रॅली दरम्यान येत्या २० तारखेला कमळ चिन्हासमोरील बटन दाबून आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रचंड विजयी करा, असे आवाहन मतदारांना करण्यात आले.

> आपला उमेदवारी अर्ज दाखल करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते स्वर्गीय दि. बा. पाटील साहेबांच्या संग्राम निवासस्थानी जाऊन दिबासाहेबांना विनम्र अभिवादन केले होते. सोमवारी सायंकाळी झालेल्या रॅलीच्या दरम्यानही आमदार प्रशांत ठाकूर यांनी संग्राम निवासस्थानी भेट दिली. यावेळी दिबासाहेबांच्या कुटुंबाकडून औक्षण करून त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.









प्रभाग क्रं.२२ मध्ये शिवसेना-भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-आरपीआय महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार संजय केळकर यांच्या प्रचारफेरीदरम्यान भाजपा ठाणे शहर उपाध्यक्ष जयेंद्र कोळी व माजी नगरसेविका नम्रता कोळी यांनी केळकर यांना भरघोस मतांनी निवडून आणण्याचे आवाहन मतदारांना केले. ही फेरी दत्तमंदिर चेंदणी कोळीवाडा, राघोबा शंकर रोड(फुल गल्ली), भंडार अळी, खारटनत रोड, माता रमाबाई चौक, महागिरी कोळीवाडा, मोहल्ला, शक्ती स्थळ, खारकर अळी, जांभळी नाका, चिंतामणी सर्कल, डॉक्टर मालतीबाई चौक, जोशी वाडा, माताअहिल्यादेवी उद्यान, एदलजी रोड, धोबी अळी, गीता सोसायटी, आंबेडकर रोड, लॉरी स्टँड, मनोर पाडा, उथळसर ह्या परिसरात मोठ्या जल्लोषात संपन्न झाली.उथलेश्वर मंदिरात दर्शन घेऊन प्रचार फेरी संपन्न झाली.

# विलास पाटील यांना उलेमा बोर्डानेही पाठिंबा जाहीर केला

**भिवंडी : भिवंडी पश्चिम येथील अपक्ष उमेदवार विलास पाटील यांना विविध धर्म आणि समाजातून अभूतपूर्व पाठिंबा मिळत आहे. गुजराती, मारवाडी समाजाच्या पाठिंब्यानंतर आता ऑल इंडिया उलेमा बोर्डानेही त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. विलास पाटील यांच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन उलेमा बोर्डाने समाजातील लोकांना केले असून त्यामुळे त्यांच्या विजयाची शक्यता अधिकच बळावली आहे. या महत्त्वाच्या बैठकीत अखिल भारतीय उलेमा बोर्डाचे महासचिव बुनेई हसनी, मौलाना नौशाद अहमद (डॉ. अब्दुल सय्यद, महाराष्ट्र कार्याध्यक्ष), साबित अली नक्शबंदी (महाराष्ट्र अध्यक्ष), मौलाना कासमी, मुंबई अध्यक्ष अखलाक निजामी आणि भिवंडीचे पदाधिकारी उपस्थित होते.**






- भिवंडी पश्चिमेतील विलास पाटील हे एकमेव उमेदवार असून त्यांच्या विजयाने भिवंडीत शांतता आणि समृद्धी नांदेल, असे उलेमा बोर्डाच्या भिवंडी प्रादेशिक अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले. विलास पाटील यांना हिंदू समाजाचाही पाठिंबा आहे, जो अन्य स्थानिक मुस्लिम उमेदवाराला मिळत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कारणास्तव, उलेमा बोर्डाने सखोल चौकशी केल्यानंतर त्याला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.
- विलास पाटील यांना मतदान करणे ही मुस्लिम समाजाने आपली जबाबदारी समजली पाहिजे, असे बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. अधिकाधिक मुस्लिम मतदारांनी त्यांना पाठिंबा देण्यासाठी मतदान करावे, जेणेकरून भिवंडीत विकास आणि शांततेचे वातावरण निर्माण होईल, असे ते म्हणाले.
- यावेळी ऑल इंडिया उलेमा बोर्डाचे सरचिटणीस बुनेई हसनी म्हणाले, प्रत्येक वर्ग आणि धर्माच्या लोकांनी मतदानात सक्रिय सहभाग घ्यावा, असा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने निवडणुकीत मतदान करावे, असे आवाहन आम्ही करतो. मतदानासाठी बाहेर या आणि लोकशाही मजबूत करा.
- ऑल इंडिया उलेमा बोर्डाने प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून चांगल्या आणि पात्र उमेदवारांची निवड केली आहे, असेही ते म्हणाले. विलास पाटील हे भिवंडीतील शिक्षण, वैद्यकीय आणि इतर सुविधांच्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणतील आणि भिवंडीतील जनतेचे चांगले भविष्य सुनिश्चित करतील, असा आम्हाला विश्वास आहे.
- भिवंडीतील नागरिकांनी विलास पाटील यांना आगामी निवडणुकीत साथ द्यावी व त्यांना विजयी करून भिवंडीचा विकास करावा, असे आवाहन उलेमा बोर्डाने केल्याची माहितीही बुने हसनी यांनी दिली. दरम्यान, विलास पाटील यांना सर्व धर्म आणि समाजातून मिळत असलेल्या पाठिंब्यामुळे त्यांच्या आशा आणखी बळकट झाल्या असून, आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांच्या विजयाची शक्यता वाढली आहे.

### १३६ भिवंडी (पश्चिम), विधानसभा मतदारसंघात

## ८५+ वरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांनी केले गृह मतदान



भिवंडी : १३६ भिवंडी (पश्चिम) मधील मतदानाचा टक्का वाढावा व मतदानापासून कोणीही मतदार वंचित राहू नये यासाठी लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणुकीसाठीही ८५ वरील ज्येष्ठ मतदारांसाठी व दिव्यांग मतदारांसाठी घरूनच मतदान करण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. गृहमतदानास दिनांक १२/११/२०२४ पासून सुरूवात झाली असून १३६ भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदारसंघात ८५+ वरील २६ ज्येष्ठ नागरिक व ०४ दिव्यांग असे एकुण ३० मतदार आहेत. या पैकी १७ जेष्ठ नागरिक (८५+) व २ दिव्यांग अशा एकूण १९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

४० टक्के पेक्षा जास्त अंपगत्व व ८५ वर्षावरील वृद्ध यांच्याकरिता भारत निवडणूक आयोगामार्फत १२डी नमुना भरून घरूनच मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ज्या इच्छुक मतदारांनी विधानसभा निवडणुक २०२४ ची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे १२ डी फॉर्म भरून दिले होते त्यापैकी पात्र मतदारांनी आज टपाली मतदान करुन आपला अधिकार बजावला. दि.१३/११/२०२४ रोजी देखील गृहमतदान सुरु राहणार आहे. ज्या मतदारांना दि.१२/११/२०२४ रोजी मतदान करणे शक्य झाले नाही त्यांनी दि.१३/११/२०२४ रोजी होणाऱ्या गृहमतदानाचा लाभ घ्यावा असे आवाहन मा. निवडणूक निर्णय अधिकारी उदय किसवे यांनी केले आहे.

# संजय केळकर मोठ्या मताधिक्याने निवडून येणार : मनोज तिवारी

ठाणे : आम्ही सिनेमा करतो, गाणी गात असतो. मात्र आज आमचा सगळ्यात मोठा उद्देश आहे, की गरीबांना चांगले दिवस यावेत, मोदी सरकारने काही समस्या सोडविल्या आहेत, काही सोडवायच्या आहेत. त्यासाठी आपल्या सर्वांना एकजुट होऊन राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणायचे आहे. मोदी यांना डबल इंजिनची भेट द्यायची असल्याचे आवाहन सिने अभिनेते मनोज तिवारी यांनी केले. ठाणे शहर विधानसभेचे उमेदवार विद्यमान आमदार संजय केळकर हे राज्यात मोठ्या मताधिक्याने निवडून येतील अशा खात्री देखील त्यांनी दिली.

मंगळवारी सायंकाळी केळकर यांच्या प्रचार रॅलीला मनोज तिवारी यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी ते उपस्थितींना संबोधीत करतांना बोलत होते. इतर आमदारांनी पीए ठेवले आहेत. परंतु केळकर हे जनसेवक आहेत, ते थेट सर्वांना भेटतात. हा त्यांच्या





मनाचा मोठेपणा असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे महायुतीसाठी मतदानासाठी मोठ्या संख्येने बाहेर पडा असे आवाहनही त्यांनी केले. महायुतीचे सरकार आल्यानंतर लाडक्या बहिणींसाठीची दिली जाणारी रक्कम ही २१०० रुपये केली जाणार आहे, सरकार आल्यावर भ्रष्टाचार समुळ नष्ट केला जाईल. आशा वर्कर यांना १५०० रुपये दिले जाणार आहेत. भाजपवाले जे बोलतात ते करतात हे यापूर्वीच्या निर्णयांवरुन देखील दिसले आहे. त्यामुळे तुम्हाला देखील आता विश्वास दाखवून महायुतीला निवडून द्यायचे आहे असे आवाहनही त्यांनी केले. एक रहेगें ते नेक रहेंगे आणि सेफ रहेंगे असा नाराही त्यांनी यावेळी दिला. मागील काही दिवसापासून ठाणे शहर विधानसभा मतदार संघात विविध ठिकाणी संजय केळकर यांच्या प्रचाराचा धडाका सुरु आहे. ठिकठिकाणी त्यांच्या रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मंगळवारी तर त्यांच्या रॅलीला प्रसिध्द अभिनेते तथा भाजपचे नेते मनोज तिवारी यांनी हजेरी लावली होती. सांयकाळी ५ ते ७ या कालावधीत केळकर यांची रॅली मानस आनंद सोसायटी डोंगरीपाडा, शिवसेना शाखा डोंगरीपाडा, शुक्ला नाका, निसर्ग तपोवन उपवन सोसायटी, कमिशनर बंगला पातलीपाडा या मार्गावर रॅली गेली. प्रत्येक ठिकाणी केळकर यांच्या रॅलीचे जंगी स्वागत करण्यात आले.

त्यानंतर ही रॅली ७ ते १० या वेळेत मानपाडा मार्केट, हनुमान मंदिर दुर्गा नगर, शंकर मंदिर मनोरमा नगर, शनी मंदिर शिवाजी चौक या भागातून गेली. या ठिकाणी देखील नागरीकांनी केळकर यांच्या रॅलीचे स्वागत केले. काही ठिकाणी महिलांनी केळकर यांचे औक्षण केले तर काही ठिकाणी त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. या रॅलीत भाजपचे माजी नगरसेवक मनोहर डुंबरे, कविता पाटील, अर्चना मनेरा, परिवहन सदस्य विकास पाटील, सुरेश दळवी, सुनील नरे, अर्चना पाटील, श्रीराम ठाकूर, महेश कदम आदींनी सहभाग घेतला होता.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +91-9167957771